सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १२ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## शिवरायांच्या किल्ल्यांना जगाचा मुजरा!

### मराठा काळातील १२ ऐतिहासिक किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

मराठा काळातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात समावेश करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा समावेश आहे. तामिळनाडूचा गिंगी किल्ला देखील या यादीचा भाग आहे. सर्व किल्ले १७ व्या ते १९ व्या शतकादरम्यान बांधले गेले.



महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांमध्ये सिंधू आणि शिवनेरी या किल्ल्यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झालेला रायगड किल्लाही याच यादीत आहे. याशिवाय साल्हेर, लोहगड, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजय दुर्ग या किल्ल्यांचा समावेश आहे.पॅरिसमध्ये झालेल्या युनेस्कोच्या ४७ व्या बैठकीत ही यादी जाहीर करण्यात आली. यामुळे मराठा इतिहास आणि वारशाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. आता भारतातील एकूण ४४ वारसा स्थळांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे.

युनेस्कोचा मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर हा १९९२ मध्ये युनेस्कोने सुरू केलेला एक आंतरराष्ट्रीय उपक्रम आहे. जगातील महत्त्वाच्या माहितीपट वारशाची ओळख पटवणे, त्यांचे जतन करणे आणि त्यांना उपलब्ध करून देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

हे एक आंतरराष्ट्रीय नोंदवही आहे ज्यामध्ये जगभरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक महत्त्व असलेले ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलिखिते, दुर्मिळ पुस्तके, छायाचित्रे, चित्रपट, ऑडिओ रेकॉर्डिंग इत्यादींचा समावेश आहे.महाराष्ट्र शासनाने 'मराठा लष्करी भूप्रदेश' या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. या शिष्टमंडळाच्या पॅरिस दौऱ्याद्वारे, या किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि राजनैतिक सादरीकरण करण्यात आले होते. अखेर छत्रपती शिवाजी महाराजांच्या या १२ किल्ल्यांचा आज युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला.

#### गौरवशाली क्षण

युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिल्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. युनेस्कोच्या या निर्णयामुळे शिवरायाचे १२ किल्ले जागतिक पटलावर आलेत. या निर्णयामुमळे पर्यटनाला चालना तर मिळेलच, पण सोबतच महाराजांचा गौरवशाली इतिहासही वैश्विक पातळीवर नेण्यासाठी आपल्याला फायदा होणार आहे, असे ते म्हणालेत. यावेळी शक्तिपीठ महामार्गाला होणारा विरोध कालांतराने थांबेल, असा विश्वासही व्यक्त केला.

## आ.रोहित पवार यांच्याविरोधात ईडीने दाखल केले पुरवणी आरोपपत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्यासह काही जणांविरोधात सक्तवसुली अंमलबजावणी संचालनालयाने पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणात पीएमपीएल कायद्यातंर्गत मुंबईतील विशेष न्यायालयात हे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.


विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. ईडीने आमदार रोहित पवार आणि इतर काही आरोपींविरोधात पुरवणी आरोपपत्र दाखल केले, या आरोपपत्राची अद्याप न्यायालयाकडून दखल घेण्यात आलेली नाही.

ईडीने काही महिन्यांपूर्वी रोहित पवार यांच्याशी संबंधित असलेल्या बारामती अॅग्रोची ५० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली होती. गेल्यावर्षी जानेवारीमध्ये ईडीने रोहित पवार यांच्याशी संबंधित मालमत्तावर छापे टाकले होते. यात बारामती अॅग्रोच्या मालमत्तांचाही समावेश होता. त्याचबरोबर ईडीने रोहित पवारांची चौकशीही केली होती. त्यानंतर हे पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.




मार्च २०२३ मध्ये ईडीने ५०.२० कोटी रुपयांची बारामी अॅग्रोची मालमत्ता जप्त केली होती. यात १६१.३० एकर जमीन, साखर कारखाना, त्यातील मशीनरी आणि इमारत यांचा समावेश आहे. ही सगळी मालमत्ता कन्नडमधील आहे. कन्नड सहकारी साखर कारखाना बारामती अॅग्रोने खरेदी केला होता. हा कारखाना कमी किंमतीत खरेदी केल्याचा आरोप आहे.

## इंजिन थांबले, पण प्रयत्न सुरूच होते...; दोन्ही वैमानिकांनी शेवटच्या क्षणापर्यंत झुंज दिली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अहमदाबाद**

१२ जून २०२५ रोजी गुजरातमधील अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडिया विमान अपघाताबाबत एएआयबीने आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. वैमानिकांनी शेवटच्या क्षणापर्यंत दोन्ही इंजिन सुरू करण्याचा प्रयत्न केला होता, यामध्ये इंजिन १ यशस्वी झाले परंतु इंजिन २ वारंवार अयशस्वी झाले, असं अहवालातून समोर आले.

एअर इंडियाच्या विमानाचा अपघात १२ जून २०२५ रोजी गुजरातमधील अहमदाबाद येथे झाला. या विमान अपघाताच्या प्रकरणात एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोचा अहवाल आला आहे. या अहवालात विमान अपघाताबाबत उड्डाणात काय घडत होते याबद्दल अनेक खुलासे करण्यात आले आहेत.

वैमानिकांनी शेवटच्या क्षणापर्यंत दोन्ही इंजिन सुरू करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये एक इंजिन सुरू झाले. पण इंजिन २ सुरू झाले नाही. वैमानिकांनी 'मेडे' कॉल देण्याच्या काही सेकंद आधी विमान वाचवण्यासाठी शेवटचा प्रयत्न केला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, मेडे कॉलच्या फक्त १३ सेकंद आधी, वैमानिकांनी इंजिन इंधन नियंत्रण स्विच कटऑफ वरून रन वर परत केला, म्हणजेच इंजिन रीस्टार्ट प्रक्रिया सुरू केली. दुपारी १:३८:५२ वाजता, इंजिन १ चा इंधन स्विच रन वर आणला. दुपारी १:३८:५४ वाजता, -झण इनलेट दरवाजा उघडण्यास सुरुवात झाली, यामुळे इंजिन सुरू होण्याची प्रक्रिया सुरू झाली. दुपारी १:३८:५६ वाजता, इंजिन २ देखील रन वर स्विच करण्यात आले. या प्रक्रियेत, ऋ-ऊएउ सिस्टम स्वयंचलितपणे इंधन आणि इग्निशनचे नियंत्रण घेते. दोन्ही इंजिनमध्ये एत्रद्ध मध्ये तीव्र वाढ दिसून आली - ही रिलाईट दाखवते.

इंजिन १ चा कोअर डिसेलेरेशन मंदावणे आणि इंजिन पुन्हा सुरू झाले. इंजिन २ देखील पुन्हा सुरू झाले, पण त्याच्या कोअरचा वेग थांबला नाही आणि वारंवार इंधन पुन्हा इंजेक्ट केले, पण इंजिन पूर्णपणे पूर्ववत सुरू झाले नाही.

EAFR चे रेकॉर्डिंग दुपारी १:३९:११ वाजता थांबले - तेव्हाच शेवटचा तांत्रिक डेटा रेकॉर्ड करण्यात आला. विमान अपघाताच्या वेळी विमानात एकूण २४२ लोक होते, यामध्ये २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्स होते. या अपघातात फक्त एक प्रवासी वाचला. याशिवाय विमान एका वसतिगृहावर पडले, यामुळे १९ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता.

## दोन्ही 'संजय'मुळे एकनाथ शिंदे सापडले चक्रव्यूहात, कडक शब्दात टोचले कान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

राज्याच्या राजकारणात शिवसेना शिंदे गटातील दोन्ही (संजय) यांची चर्चा सुरूये. दोन्ही नेते वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. आमदार संजय गायकवाड यांनी आधी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत वादग्रस्त विधान केलं होतं. त्यानंतर आमदार निवासाच्या कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला ठोशा देऊन मारहाण केली. तर, मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये शिरसाट



बेडरूममध्ये बसलेले दिसत असून, बेडशेजारी पैशांनी भरलेली बॅग दिसत आहे. या प्रकरणानंतर विरोधकांकडून टीकेची झोड उठली. दरम्यान, या दोन्ही प्रकरणात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कडक शब्दात कान टोचल्याची माहिती समोर आलीय.

दोन्ही संजय यांच्या कारनाम्यानंतर एकनाथ शिंदे तीव्र नाराज असल्याची चर्चा आहे. आमदार संजय गायकवाड आणि मंत्री संजय शिरसाट यांनी केलेल्या बेशिस्त वक्तव्य आणि वागणुकीमुळे पक्षाची प्रतिमा डागाळली. तसेच हा बेशिस्तपणा खपवून घेतला जाणार नाही, असंही शिंदे म्हणाले. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी दोन्ही शिलेदारांना कडक शब्दांत फटकारल्याची माहिती आहे.गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदे यांच्या गटातील तिन्ही नेत्यांमुळे राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. तिघांच्या कारनाम्यामुळे सरकरामध्ये एकनाथ शिंदे यांची कोंडी झाली आहे. आमदार संजय गायकवाड यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत वक्तव्य करताना अपशब्दाचा वापर केला. नंतर त्यांचा हाणामारी करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. आमदार निवासातील निकृष्ट दर्जाच्या अन्नावरून त्यांनी कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला बेदम चोप दिला.याचा व्हिडिओही व्हायरल झाला आहे.

## शरद पवारांनी भाकरी फिरवली...राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खांदेपालट, जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपद सोडलं

### प्रदेशाध्यपदाची धुरा आता शशिकांत शिंदे सांभाळणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आमदार शशिकांत शिंदे हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नवे प्रदेशाध्यक्ष होणार आहेत. शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यपदी निवड करण्यात आली आहे. येत्या १५ जुलैला म्हणजे मंगळवारी शशिकांत शिंदे हे प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार आहेत.



जयंत पाटील हे गेल्या अनेक दिवसांपासून मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा अशी मागणी करत होते. पुण्यात झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापददिनाच्या कार्यक्रमात देखील भाषण करताना त्यांनी शरद पवार यांच्यासमोर प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा असे बोलून दाखवले होते. त्यावेळी साहेब जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल असं देखील जयंत पाटील यांनी सांगितले होते.

'पवारसाहेबांनी मला बरीच संधी दिली. सात वर्षांचा कालवधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे गरजेचे आहे.', असे म्हणत त्यांनी शरद पवार यांचे आभार देखील मानले होते. जयंत पाटील यांच्यानंतर प्रदेशाध्यक्ष कोण होणार याची चर्चा सुरू होती. अखेर शरद पवार यांनी निर्णय घेतलाच. जयंत पाटील यांनी आज प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर या पदासाठी साताऱ्याचे आमदार शशिकांत शिंदे यांना संधी देण्यात आली आहे.

आता राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यपदाची धुरा शशिकांत शिंदे सांभाळणार आहेत. १५ जुलै रोजी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची महत्वाची बैठक देखील होणार आहे. याच बैठकीत शशिकांत शिंदे प्रदेशाध्यपद स्वीकारणार आहेत. शशिकांत शिंदे हे विधान परिषदेचे आमदार आणि मुख्य प्रतोद आहेत. १८ फेब्रुवारी २०२४ पासून जयंत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष होते.

## माझ्या जन्मभूमी व कर्मभूमीची मराठी भाषा पहिली,हिंदुस्थानातील दुसऱ्या क्रमांकावर हिंदी भाषेचा सुद्धा सन्मान केला पाहिजे : नवनीत राणा

### उद्धव व राज ठाकरे यांच्यावर ही टिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

मला शेवटच्या श्वासापर्यंत मराठीचा अभिमान राहील कारण मी या महाराष्ट्रात जन्माला आली,ज्या राज्यात तुम्ही राहतात ती भाषा सगळ्यात पहिली असते,माझी जन्मभूमी व कर्मभूमीची भाषा मराठी असल्याने मी तिला समोर ठेवणार आहे, पण ज्या हिंदुस्तान मध्ये मी राहते त्या हिंदी भाषेला सुद्धा दुसऱ्या क्रमांकावर आम्ही त्या भाषेचा सन्मान करतो, पण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे स्वत:ची राजकीय पोळी शेकण्याकरिता देवेंद्र



फडणवीस यांच्यावर टीका करतात तर मराठी व हिंदी भाषेत तेढ निर्माण करण्याचं काम करतात त्यांनी हे सांगा की तुमचे मुलं मराठी शाळेत शिकले की हिंदी भाषेत शिकले?असा सवाल भाजप नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी अमरावतीमध्ये आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभामध्ये ठाकरे बंधूंना केला...तर बरेच नेते हे हिंदी आणि मराठी भाषेमध्ये वाद घालून महापालिकेची पोळी शिकण्याचा प्रयत्न करत आहे.

कंधो से उचित छाती नही होती,धर्म से बडी कोई जाती नही होती,दीपक ही नही बचा तो बाकी का क्या करोगे?अगर धर्म ही नही बचा तो जाती का क्या करोगे त्यामुळे हिंदुस्थानात माझ्यासाठी धर्म आहे कर्म आहे पूजा आहे,यामध्ये हिंदूंचं विभाजन करू नका,असे वक्तव्य नवणीत राणा यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला प्रचंड असा प्रतिसाद या वेळी मिळाला.

## नांदगाव नगर पंचायत क्षेत्रा अंतर्गत भोगवटा धारकांना घरकुल द्या - प्रकाश मारोटकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नांदगाव खंडेश्वर**

नगर पंचायत क्षेत्रा अंतर्गत राहणाऱ्या नागरिकांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यात यावा व नगर पंचायत कार्यालयाची इमारत मंजूर करावी अशी मागणी ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे निवेदन सादर करून केली नांदगाव शहरात अनेक वर्षांपासून शेकडो गोर गरीब नागरिक पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल लाभा पासून त्यांचेकडे जागेचा आठ अ नसल्याने वंचित आहे शहरातील इंदिरा आवास नगर ओंकारखेडा



गोवारी पुरा मातंग पुरा चांद पुरा पारधी बेडा पोलीस स्टेशन परिसर दत्त टेकडी माळी पुरा बारी पुरा जुना आठवडी बाजार परिसर तहसील परिसर चांदुर रेल्वे रोड बहिरम टेकडी या भागातील रहिवाशी नागरिकांच्या जागेला भोगवटा कर आकारण्यात आला असून यापूर्वी ग्राम पंचायत व सध्या स्थितीत नगर पंचायतनि या भागात सर्व मूलभूत सोइ सुविधा नाली रस्ते स्ट्रीट लाईट समाजभवन सभागृह इत्यादी विकास कामे सुद्धा झाली आहे म्हणून अतिक्रमण निमाकुल करण्याचा शासन निर्णया नुसार सदर भोगवटा धारक नागरिकांना त्याच ठिकाणी कायम करून घरकुलचा लाभ द्यावा व नगर पंचायत कार्यालयाचे कामकाज भाड्याच्या इमारतीत सुरू असून न प कार्यालयाचा प्रस्ताव मंजूर करून निधी उपलब्द करावा तसेच नव्याने ३०० घरकुलाचा प्रस्तावास मान्यता द्यावी अशी मागणी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी निवेदन सादर करून केली.

## संपादकीय ......

# जनतेच्या सुरक्षेसाठी...

गेले वर्षभर ज्या जनसुरक्षा कायद्यातील तरतुदींवरून वाद सुरू होता, ते विधेयक अखेर विधानसभेत मंजूर झाले. पुढील वर्षापर्यंत देश नक्षलवादमुक्त करण्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली असून, त्यादृष्टीने ठोस पावले टाकली जात आहेत. सीआरपीएफ जवानांच्या मदतीने विविध राज्यांतील नक्षलवाद्यांचा कणा मोडलेला आहे. मात्र आजही देशातील लोकशाही संस्थांवर हल्ले करण्याच्या कारवाया काही संघटना आणि अर्बन नक्षलवादी करत आहेत. महाराष्ट्राच्या प्रगतीत त्यामुळे बाधा येऊ शकते आणि म्हणूनच नव्या कायद्याची गरज होतीच. देशाची राज्य घटना, संवैधानिक संस्था, कायदे व सरकारविरोधात कारवाया, जनआंदोलन किंवा जनमत निर्माण करणार्या कडव्या डाव्या विचारसरणीच्या बेकायदेशीर व नक्षलवादी संघटनेवर बंदी आणण्याची आणि सदस्यांवर कारवाई करण्याची तरतूद या नव्या कायद्यात करण्यात आली आहे. या अंतर्गत प्रारंभी व्यक्तीवर कारवाई होणार नसून, संबंधित संघटनेवर बंदी घातली जाणार आहे. एखादी माओवादी संस्था किंवा संघटना संविधानाविरोधातील बेकायदा कृत्यांत सहभागी असल्याचे निदर्शनास आल्यास उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायमूर्ती, निवृत्त जिल्हा न्यायाधीश आणि उच्च न्यायालयातील सरकारी वकील अशा त्रिसदस्यीय सल्लागार मंडळापुढे बंदीचा प्रस्ताव ठेवला जाईल.

सल्लागार मंडळाने पुराव्याची तपासणी करून बंदी घालण्यास मान्यता दिली, तरच राज्य सरकार त्यासंबंधीची अधिसूचना जारी करेल. त्या संस्थेला ३० दिवसांमध्ये बंदीविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची मुभा असेल. त्यानंतरच अशा बंदी घातलेल्या संस्था वा संघटनेचा सदस्य हा बेकायदेशीर कृत्यांत सहभागी असल्याचे आणि तो विरोधी जनमत तयार करून संघटनेस आर्थिक मदत करत असल्याचे पुरावे हाती आल्यास, त्याच्यावर पोलिस कारवाई करतील. याचा अर्थ एखाद्या व्यक्तीवर वा त्याच्या संघटनेवर सूडबुद्धीने सरकारने कारवाई केल्यास न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग मोकळा आहे. तसेच पुरव्यांशिवाय कोणतेही पाऊल सरकारला उचलता येणार नाही. सरकारविरोधात शेतकरी, कामगार, विद्यार्थी अशा कोणालाही आंदोलने व मोर्चे काढण्याची, तसेच विरोधी भूमिका मांडण्याची पूर्ण मुभा घटनेनेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करून दिली आहे. या नव्या जनसुरक्षा कायद्याचा गैरवापर होण्याची भीती व्यक्त केली जाते आणि त्या कारणानेच त्याला विरोधही होतो आहे. विरोधकांवर आकसाने कारवाई केली जाणार नाही आणि विशेष जनसुरक्षा कायद्याचा गैरवापर होणार नाही, असे अभिवचन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आरोपाच्या पार्श्वभूमीवर विधानसभेत दिले आहे. कायद्याचा वापर करून डाव्या विचारांच्या संघटना, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष आदी कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेते व कार्यकर्त्यांवर तसेच शेतकरी, शिक्षक व विद्यार्थी संघटनांवर करवाई होणार नाही. त्यांनी मनात कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही, या शब्दांत त्यांनी आश्वस्त केले आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा अपवाद वगळता, आवाजी मतदानाने विधेयक मंजूर झाले. अर्थात मूळ विधेयकात 'व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी' या शब्दयोजनेऐवजी, 'कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या' किंवा त्यासारख्या संघटनांच्या असा स्वागतार्ह बदल केला गेला. म्हणजेच हे विधेयक अतिरेकी कृत्ये करणार्या सर्वांविरुद्ध आहे, असे सूचित केले आहे. कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना, असा बदल केल्याने सरकारला सरसकटपणे कोणाच्याही विरोधात अटकेची कारवाई करता येणार नाही. समितीने केलेल्या सुधारणांनुसार विधेयकात काही स्वागतार्ह बदल केले गेले.

सरकारने एक पाऊल मागे घेत, विरोधकांनी सुचवलेल्या शिफारशी मान्य केल्या. विधेयकातील कठोर तरतुदींना सामाजिक संघटनांनी विरोध दर्शवला होता. केवळ 'व्यक्ती आणि संघटना' अशी तरतूद कायम राहिली असती, तर सरकारविरुद्ध भूमिका घेणारी कोणत्याही व्यक्ती अथवा संघटनेवर कारवाईचा अधिकार सरकारला प्राप्त झाला असता. ही पुसटशी आणि सोयीने वापरता येणारी कायदेशीर तरतूद पुसून टाकली गेली. त्यात स्पष्टता आणली गेली. सरकारला अशाप्रकारे अमर्याद अधिकार प्राप्त होणे योग्य नव्हते. म्हणूनच सामाजिक संघटना तसेच कार्यकर्त्यांचा त्याला विरोध होता. या कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्याची चौकशी पोलिस उपनिरीक्षकांऐवजी, पोलिस उपधीक्षक दर्जाचे अधिकारी करतील. अर्थात अनेकदा वरिष्ठ अधिकारीही अधिकाराचा दुरुपयोग करतात आणि आंदोलकांवर निष्ठूरपणे कारवाई करतात. अशा कारवाईसाठी सोपे हत्यार ठरण्याला पायबंद घातला गेला. शेतमजूर, शेतकरी, कामगार अशांच्या प्रश्नांसाठी लढणार्या कार्यकर्त्यांना आंदोलनाच्या अगोदरच ताब्यात घेणे, सतत नोटिसा पाठवून आंदोलकांच्या कुटुंबीयांनाही त्रास देणे अशा घटना घडत असतात. लोकशाहीत जनतेच्या प्रश्नांवर उपोषणे, मोर्चे, निदर्शने होणारच. केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने पीएमएलए हा 'मनी लाँडरिंग'विरोधातील कडक कायदा केला. त्यामुळे अनेकांचे काळे धंदे बाहेर आले. गेल्या काही वर्षांत एनडीए सरकारने याच कायद्याच्या मदतीने भ्रष्टाचाराविरोधातील मोहीम तीव्र केली. पण काही बाबतीत या कारवाया चुकीच्या पद्धतीने झाल्याचेही न्यायालयानेच दाखवून दिले. त्यामुळेच जनसुरक्षा कायद्याचाही गैरवापर होऊ नये, यादृष्टीने मूळ विधेयकात फेरफार करावेत, असा सामाजिक कार्यकर्त्यांचा आग्रह होता. आता राज्य सरकार आणि विरोधकांनी भूमिका ताणून न धरता, योग्य तो बदल करून जनसुरक्षा विधेयक मंजूर केले. सरकारकडे स्पष्ट बहुमत असल्याने ते मंजूर होण्यात

# गाजरगवताची एलर्जी झाल्यास काय कराल? कशी घ्याल काळजी; जाणून घ्या सविस्तर




**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

पावसाळ्याच्या दिवसांत शेतमालक, शेतमजूर तसेच वनभ्रमंती करणारे नागरिक गाजरगवताच्या संपर्कात येतात आणि त्यातून लर्जीच्या विविध लक्षणांना सामोरे जावे लागते.गाजरगवत ही एक हानिकारक आगंतुक वनस्पती असून, तिचा मानवी शरीरावर तीव्र प्रतिकूल परिणाम होतो. यामुळे त्वचाविकार, श्वसनविकार, डोळ्यांची आग, ताप आणि दम्याचे त्रास निर्माण होतात अशी माहिती तज्ज्ञांनी दिली.

शेतात काम करताना संपूर्ण शरीर झाकले जाईल, असे कपडे घालावे. ट्रेकिंग, वन पर्यटन करतानाही संपूर्ण शरीर झाकले जाईल, असेच कपडे परिधान करावे, गाजरगवताला बीजे येण्यापूर्वीच मुळासकट उपटावे. हे करत असताना आपल्या हातामध्ये सुरक्षामक हातमोजे घालणे महत्त्वपूर्ण असते.लर्जीची प्राथमिक लक्षणे कोणती?

**त्वचेवर पुरळ :** गाजरगवताच्या संपर्कानंतर त्वचेवर लहान पुरळ उठतात.

**असह्य खाज :** संपर्क झालेल्या भागात तीव्र खाज सुटते.

**पुरळातून पाणी :** खाजवल्यास पुरळातून पाणी येते व त्वचा अधिक संक्रमित होते.

**श्वसन समस्या व ताप :** काही रुग्णांमध्ये दम्याचे किंवा तापाचे लक्षणही दिसून येतात.

गाजरगवताची लर्जी झाल्यानंतर प्रथमोपचार म्हणून खोबरेल तेल, कोरपडचा गर लावता येतो. मात्र, त्रास वाढल्यास तसेच गंभीर स्वरूपाची लर्जी झाल्यास त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला व उपचार घ्यावा. औषधी, लोशनद्वारे लर्जी बरी होते.

**धोका कोणाला?**

गाजरगवत हे कोणत्याही ऋतूमध्ये आणि कुठल्याही प्रकारच्या जमिनीमध्ये उगवण्यास सक्षम असते. गाजरगवताचे बीज हे हवा, पाणी किंवा सजीव प्राण्यांमुळे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी वितरित होतात आणि गाजरगवताचा प्रभाव वाढवतात.- **डॉ. नीलेश टापरे,** वैद्यकीय अधीक्षक, खामगाव जि. बुलढाणा.


विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


## ही चाल तुरुतुरु! मॉर्निंग वॉक करुनही वजन कमी होत नसेल तर 'असं' ५ पद्धतींनी चाला..




**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

वॉक करणे म्हणजेच चालायला जाणे हा अनेक जणांचा अतिशय आवडीचा व्यायाम. कारण यामुळे थोडा वेळ घराबाहेर मोकळ्या हवेत जायला मिळतं. त्यामुळे आपोआपच मन फ्रेश होतं.



बाहेरच्या कित्येक गोष्टी नव्याने दिसतात त्यामुळे चालताना मजा येते. शिवाय चालण्याचा व्यायाम केल्याने पाय मोकळे होतात. पचन चांगलं होऊन जेवण व्यवस्थित जातं आणि शिवाय वजनही नियंत्रित ठेवण्यास मदत होते. चालण्याचा व्यायाम तर चांगला आहेच, पण त्या चालण्यात जर तुम्ही थोडं वेगळेपण आणलं तर नक्कीच त्याचा आणखी जास्त फायदा तुमच्या शरीराला होऊ शकतो.

१. त्यामध्ये पहिला प्रकार त्यांनी ताडासनात चालण्याचा सांगितला आहे. यासाठी सगळ्यात आधी ताडासन करा. यानंतर फक्त पायाच्या बोटांवर शरीराचा सगळा भार पेलून ३ ते ४ मिनिटांसाठी चाला. हा व्यायाम केल्याने बॉडी पोश्चर सुधारण्यास मदत होते. तसेच पाठदुखी, मानदुखीही कमी होते.

२. दुसऱ्या प्रकारात त्यांनी टाचा जमिनीवर टेकवून फक्त टाचांवरच चालण्याचा सल्ला दिला आहे. हा व्यायामही ३ ते ४ मिनिटे करा. यामुळे शरीरातील रक्ताभिसरण चांगले होते आणि पायाच्या घोट्यासाठीही हा व्यायाम चांगला असतो.

३. तिसरा चालण्याचा प्रकार म्हणजे मलासन करणे आणि मग त्याच अवस्थेत चालणे. तुम्हाला शक्य होईल तेवढ्या मिनिटांसाठी हा व्यायाम करा. यामुळे पचन चांगले होते. शिवाय प्रजनन संस्थेशी निगडीत आजारही बरे होतात.

४. चौथं आहे हिप वॉकिंग. हा व्यायाम करण्यासाठी जमिनीवर पाय पसरून बसा आणि यानंतर हिप्सची हालचाल करत पुढे सरका. हा व्यायाम केल्यामुळे कंबरेच्या खालच्या भागात किंवा हिप्समध्ये होणारा त्रास कमी होतो. तसेच हिप्सवरील चरबी कमी होण्यासाठीही मदत होते.

५. पाचवा व्यायाम म्हणजे रिव्हर्स वॉकिंग. यामुळे गुडघ्यांची ताकद वाढते. शिवाय बॉडी पोश्चर सुधारण्यासही मदत होते.

# ३० हजार विद्यार्थिनी गिरवणार कराटेचे धडे

## जिल्हा पोलिस दल ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत देणार प्रशिक्षण, तज्ज्ञ करणार मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२यवतमाळ-** जिल्ह्यात घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढत असलेले बाल गुन्हेगारांचे प्रमाण यावर वेळीच पायबंद बसावे आणि समाजामधील सध्याच्या गंभीर प्रश्नासंदर्भात शालेय जीवनातच विद्यार्थी सजग व्हावे यासाठी जिल्हा पोलिस दलाने विशेष उपक्रम हाती घेतला आहे. त्यात जिल्हा पोलिस दलाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयात शिकणाऱ्या तब्बल ३० हजार विद्यार्थीनींना त्यांच्या शाळा, महाविद्यालयात जावून आत्मसंरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासोबतच या शाळा महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. आतापर्यंत ऑपरेशन प्रस्थान या अभिनव उपक्रमातर्गत भव्य रोजगार मेळावा घेण्यात आला. त्यामध्ये ७५०० युवकांनी सहभाग घेतला होता. तसेच पोलीस व जनतेतील संबंध दृढ व्हावे, ग्राम पातळीवरून शहरी भागापर्यंत खेळाडूंना संधी मिळावी, याकरिता क्रीडा महोत्सव घेण्यात आला होता. त्यानंतर मुली-महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्याचे ऑपरेशन प्रस्थान उपक्रमांतर्गत १८०० मुलींना कराटे प्रशिक्षणाचे धडे देण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

वैयक्तिक शिस्तीबाबत मार्गदर्शन या ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत शाळांमध्ये शालेय मुलींच्या स्वसंरक्षण कौशल्या करीता कराटेचे प्रत्यक्ष धडे देण्यात आले. तसेच सायबर कायदे, वाहन कायदा, वाहतुक, नागरी शिस्त, महिलांचे कायदे आणि नवीन फौजदारी कायदे, आरोग्य याबद्दल जागरुकता व्हावी यासाठी माहिती देण्यात आली. केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर मिनल जगताप यांनी बाल गुन्हेगारी व त्यांचे दुष्परिणाम, १८ वर्षाखालील मुलांकडून होणारे गुन्हे याचे समाजावर आणि मुलांवर अनेक दुष्परिणाम, डॉ. सरफराज अहमद सौदागर मानस शास्त्र तज्ज्ञ यांनी व्यसनाधिनता व त्याचे दुष्परिणाम तर प्रा. धनश्याम दरणे सर सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय यांनी वैयक्तिक शिस्त याबाबत मार्गदर्शन केले.

# श्री क्षेत्र कौंडण्यपुरातील दहीहंडी उत्सवात उसळला भक्तांचा महासागर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२कौंडण्यपूर-** श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला गेलेली माता रुक्मिणीची पालखी ११ जुलै रोजी कौंडण्यपुरात परत आली. त्यानंतर दिवसभर पायदळ वारकरी भक्तांनी माता रुक्मिणीच्या पालखीसह विदर्भातील अन्य पायदळ पालखींचे स्वागत व दर्शनासाठी गर्दी केली होती.

तत्पूर्वी, रिंगण सोहळा पार पडला. दुपारी ४ वाजता दहीहंडी उत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

याप्रसंगी संस्थानच्या वतीने भाविकांना दहीहंडी प्रसादाचे वितरण केले. या सोहळ्यानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यात्रा भरली होती.

# महाराष्ट्र ठरणार पहिले राज्य; पशुसंवर्धन व्यवसायास कृषीसमकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२मुंबई-** महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे.

या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांना नव्या सवलतींचा लाभ होणार आहे.या निर्णयानुसार, पशुधन आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील, अशी घोषणा पशुसंवर्धनमंत्री मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी शुक्रवारी (दि. ११ जुलै २०२५) विधीमंडळात केली.

पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा केली व चर्चेअंती या विषयावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१) पशुसंवर्धन व्यवसायाला कृषि समकक्ष दर्जा देण्यास मान्यता. २) २५,००० मांसल कुक्कुट पक्षी/५०,००० अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५,००० क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायास, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी/ शेळीपालन व २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषि वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता. ३) उपरोक्तप्रमाणे पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न



समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषि व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली. ४) कृषिप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यास मान्यता देण्यात आली. ५) कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यास मान्यता. ६) सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अतिरीक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यास मान्यता.

या निर्णयांमुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७५ लाख कुटुंबे पशुसंवर्धनाच्या व्यवसायाता आहेत, त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. खऱ्या अर्थानं हा ऐतिहासिक निर्णय आहे.राज्यामधील सर्व पशुपालकांना याचा मोठा फायदा होऊन पशुसंवर्धन विभागाच्या वाढीस याची मोठी मदत होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) श्री. अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १२ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

# मागील वर्षीच्या तुलनेत राज्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ

## कोणत्या विभागात सर्वाधिक पाणीसाठा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

सध्या विदर्भात पावसाने कहर केला असून, आतापर्यंत झालेल्या पावसामुळे राज्यातील धरणांच्यापाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. सध्या राज्यातील धरणसाठा सुमारे ५९ टक्क्यांवर पोहोचला आहे.



या पाणीसाठ्यामुळे पुढील काही महिन्यांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे. गेल्या वर्षी राज्यात हाच साठा २७ टक्के होता. गेल्या वर्षाच्या तुलनेत हा साठा ३२ टक्क्यांनी जास्त आहे.

मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने येथील साठा केवळ १० टक्के आहे, तर कोकणातील धरणांत ७४ टक्के पाणी जमा झाले आहे.

राज्याच्या काही भागांत मे महिन्यापासून अवकाळीने तर जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनने हजेरी लावली. त्यानंतर जुलैच्या पहिल्या टप्प्यातदेखील पावसाची बॅटिंग जोरात सुरू आहे.

त्यामुळे नेहमीच्या वेळेपूर्वीच धरणांमध्ये पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली आहे.

राज्यात सध्याचा पाणीसाठा ५९ टक्क्यांवर गेला आहे. त्यातही मध्य महाराष्ट्र, विदर्भात पावसाची हजेरी सरासरीपेक्षा जास्त असल्यामुळेच या भागात धरणामध्ये पाणीसाठा इतर विभागातील धरणांपेक्षा जास्त असल्याचे आकडेवारीवरून दिसून आले आहे.

राज्यातील सर्वच विभागांत असलेल्या धरणामध्ये सध्या

### राज्यातील जलसाठा

| विभाग | धरण | आजचा साठा | गतवर्षी साठा |
|---|---|---|---|
| नागपूर | ३८३ | ४८.४० | ३७.८१ |
| अमरावती | २६१ | ४७.४९ | ४०.८५ |
| संभाजीनगर | ९२० | ४३.४६ | १०.३३ |
| नाशिक | ५३७ | ५७.४५ | २४.४२ |
| पुणे | ७२० | ६८.९६ | २५.२७ |
| कोकण | १७३ | ७४.४९ | ४७.४३ |
| एकूण | २९९४ | ५८.८६ | २७.३८ |

एकूण ५८.८७ टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी हाच साठा २७.३८ टक्के होता. यंदा हा साठा गेल्या वर्षाच्या तुलनेत ३१.४८ टक्क्यांनी जास्त आहे.

राज्यात जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत मोठी, मध्यम आणि लहान अशी मिळून २ हजार ९९७ धरणे आहेत.

जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार सद्य:स्थितीत राज्यातील संभाजीनगर विभागात सर्वांत कमी १०.३३ टक्के पाणीसाठा आहे.


तर सर्वाधिक साठा कोकणात सुमारे ७५ टक्के इतका झाला आहे. विदर्भाचा काही भाग, मध्य महाराष्ट्राचा काही भाग आणि कोकणात सर्वांत पाऊस जास्त बरसला.

त्यामुळे या भागातील बहुतेक सर्वच धरणांच्या पाणीपातळीत चांगलीच वाढ झाली आहे.

# कांडली ग्रामपंचायतीतील रस्त्याच्या दयनीय अवस्थेने नागरिक त्रस्त

## मूलभूत सुविधांच्या अभावामुळे निवडणूक बहिष्काराचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अचलपूर** - ३अचलपूर तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या कांडली ग्रामपंचायतीतील वासनकर लेआऊट भागात रहिवासी मूलभूत नागरी सुविधांच्या अभावामुळे अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. पारधी सरांच्या घरापासून ते भेले सरांच्या घरापर्यंतचा कच्चा रस्ता प्रत्येक पावसाळ्यात साचलेल्या पाण्यामुळे चिखलमय होतो, डबक्यांमध्ये डासांचा उपद्रव वाढतो आणि परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण होते. यामुळे आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालल्या आहेत.



या परिसरात २५ ते ३० वर्षे जुना लेआऊट असूनही आजतागायत रस्ते, नाली, वीज खांब, गटार व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. वीज खांब खांब नसल्याने नसल केबल वायर जमिनीवर लोंबकळत आहेत, जे अपघातास कारणीभूत ठरत आहे. स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, या रस्त्यावरून वाहनांची ये-जा अशक्य झाली आहे. ऑटोरिक्षा आत येऊ शकत नाही, त्यामुळे आजारी व्यक्तींना दवाखान्यात नेणेही दुरापास्त झाले आहे. पावसाच्या दिवसात गाडी चालवणे तर सोडाच, पायी चालणेही धोकादायक ठरते. गाड्या गटच्यात अडकून अपघातही झाले आहेत.ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी व निवेदने दिल्यानंतरही केवळ आश्वासने मिळत आहेत, प्रत्यक्ष कृती मात्र शून्य आहे. ग्रामसचिवांनी रस्त्याच्या समस्येसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधा असा सल्ला देऊन जबाबदारी झटकली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.वॉर्ड क्र. ६ मधील स्थानिक सदस्य दिलीप गंगा घंडारे, अक्षरा काकड, सचिन घोरे यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्या, मात्र परिस्थितीत कोणताही फरक पडलेला नाही. गंगा धंडारे यांनी जुन्या वस्तीतील बहुसंख्य गल्ल्यांमध्ये रस्ते तयार केले, पण आमच्याच वासनकर लेआऊटचा विसर कसा पडला, हे समजत नाही, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. वासनकर लेआऊट हा जुन्या वस्तीला लागून असतानाही त्याकडे दुर्लक्ष का ? या साऱ्यामुळे आता कॉलनीतील नागरिकांनी आगामी ग्रामपंचायत निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून, फक्त ४० ते ५० फूट रस्त्यासाठी आंदोलन करावं लागणार का ? असा प्रश्न ते उपस्थित करत आहेत. लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार मताधिकाराचा बहिष्कार करणे हा प्रशासनासाठी मोठा इशारा आहे. शासन आणि स्थानिक यंत्रणांनी तातडीने या समस्येकडे लक्ष न दिल्यास स्थानिक नागरिकांचा रोष मोठ्या आंदोलनाचे रूप घेऊ शकतो. सामान्य नागरिक रस्ता, नाली, वीज यासाठी अजून किती वर्षे वाट पाहावी? स्वच्छता आणि सुरक्षिततेसाठी ही लढाई आता एक आंदोलनाची दिशा घेणार हे निश्चित.

# रात्र निवारा मोहिमेस यश - पाच बेघर नागरिकांना मिळाला सुरक्षित निवारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**,अमरावती महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या संयुक्त शोधमोहीमेद्वारे शहरातील पाच बेघर नागरिकांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यात आला. ही मोहिम राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (छणङच्) विभाग व अतिक्रमण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आली.दिनांक १० जुलै रोजी रात्री ८:३० ते १२:०० या वेळेत मुख्य रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, मंदिर परिसर अशा ठिकाणी उघड्यावर झोपणाऱ्या नागरिकांचा शोध घेण्यात आला. मोहिमेदरम्यान एकूण ५ बेघर नागरिक आढळून आले. या सर्वांना तत्काळ 'रात्र निवारा केंद्र - बडनेरा' येथे हलविण्यात आले. संबंधित केंद्रात त्यांना अन्न, पाणी, वैद्यकीय सुविधा तसेच सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यात आला.अमरावती महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारच्या मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असून, कोणताही नागरिक उघड्यावर झोपू नये यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार आहेत.शहरात बेघर स्थितीत राहणारे नागरिक आढळल्यास अथवा अशा व्यक्तींना मदतीची आवश्यकता वाटल्यास, नागरिकांनी तात्काळ महानगरपालिकेच्या छणङच् विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.



# पालकमंत्र्यांकडील तक्रारींवर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुनावणी

## २० तक्रारींवर झाली सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती,**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे विविध ठिकाणी आलेल्या निवेदनांवर जिल्हाधिकारी यांनी आज सुनावणी घेतली. यात तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधित विभागांना सुचना केल्या. तसेच नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी दिलेल्या निर्देशांचे पालन करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिल्या. पालकमंत्री श्री. बावनकुळे आणि त्यांच्या पालकमंत्री कार्यालयात नागरिक भेटी देऊन समस्यांबाबत निवदेन सादर करतात. या तक्रारींवर संबंधित तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. यावेळी तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विभागाप्रमुखांना उपस्थित राहिल्याने थेट निर्देश देऊन तक्रारीच्या अनुषंगाने नागरिकांचे समाधान करण्यात आले. यावेळी परिविक्षाधिन अधिकारी कौशल्या, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, तहसिलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते.आज झालेल्या तक्रारींमध्ये पर्यावरणाची शपथ सर्व शाळांमध्ये देण्यात यावी, यासाठी सर्व शाळांना निर्देश द्यावे. असदपूर बुडीत क्षेत्रातील



व्यावसायिकांना मदत करून त्यांच्या व्यापारासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन मागवावे. तसेच असदपूर-अमरावती बस सेवा नियमित सुरू करण्यासाठी विभागनियंत्रकांना सूचना देण्यात येणार आहे. फ्रेजपूरा येथील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची आवश्यकता आहे. त्यानुसार योग्यवेळी याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. हनुमान मंडळासाठी लिजवर जागा आवश्यक असल्याने त्यांनी नोंदणीकृत ट्रस्टद्वारे अर्ज करावा, यावर जिल्हास्तरावर गतीने कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

मेळघाटातील वाघाच्या हल्ल्यात नागरिकांचा मृत्यू होत असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी प्रभुदास भिलावेकर यांनी केली. याबाबत वन कायद्यानुसार सर्व परवानगी घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. तसेच मेळघाटात अवैध धंद्यांवर तातडीने कार्यवाही करावी. आवश्यकता भासल्यास तडीपारीची कार्यवाही करावी. त्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पाठवावा, असे निर्देश दिले. मेळघाटातील खासगी प्रवाशी वाहतूक करणाऱ्या बसेसची स्थिती प्रादेशिक परिवहन विभागातर्फे तपासण्यात येतील. यात आवश्यक तेनुसार कार्यवाही करण्यात येतील. यासोबत आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्या बात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# दादासाहेब गवई स्मारकाचे एकाचवेळी लोकार्पण - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-** रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे स्मारक विद्यापीठ परिसरात करण्यात येत आहे. पुतळा, आर्ट गॅलरी आणि सभागृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. स्मारकाची कामे गतीने पूर्ण करून एकाचवेळी संपूर्ण स्मारक लोकार्पण करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

यावेळी बांधकाम विभागाच्या अधिक्षक अभियंता रूपा गिरासे, कार्यकारी अभियंता श्री. गिरी यांच्यासह दूरदृष्य प्रणालीद्वारे स्मारकाशी संबंधित वास्तू विशारद, शिल्पकार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, स्मारकांच्या अंतर्गत असणारा पुतळा तयार करण्यासाठी गवई यांच्या कुटुंबियांना सोबत घ्यावे. त्यांच्या सांगण्यानुसार सुधारणा करावी. पुतळ्याचे क्ले मॉडेल तयार आहे. हा पुतळा कला संचालनालयाकडून तपासून घ्यावा. तसेच शासकीय पातळीवर लागणाऱ्या सर्व परवानगी आणि पुतळा बसविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जागेची पाहणी करावी. पुतळा हा साधारणत: १५ फुट उंचीचा राहणार असल्याने यासाठी आवश्यक बांधकामाची पाहणी करून पुतळा बसविण्यात यावा. आर्ट गॅलरीमधील छायाचित्र, तसेच गवई यांना प्राप्त झालेले पुरस्कार, सन्मान याबाबत कुटुंबियांची मदत घेऊन उत्कृष्टपणे स्मारकाच्या ठिकाणी प्रदर्शित करावे. स्मारकाचे संकेतस्थळ तयार करण्यात येणार आहे. यावर प्रकाशित करण्यात येणारा मजकूर बारकाईने वाचावा. व्याकरण आणि शुद्धलेखनाच्या चुका होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. यात तज्ज्ञांची मदत घेतली जावी. आवश्यकता भासल्यास कुटुंबियांकडून मजकूर तपासून घ्यावे. याठिकाणी सोलार आणि वातानुकूलीत यंत्रणा बसविण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक ती कामे तातडीने करून घ्यावी. स्मारकासाठी लागणारा संपूर्ण निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे स्मारकाच्या निर्मितीचे काम गतीने करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.



# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केली फिशरीज हबची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज फिशरीज हबची पाहणी केली. पाहणी दरम्यान शहर अभियंता रविंद्र पवार, नोडल ऑफीसर तथा पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अभियंता राजेश आगरकर, सुधीर गोटे तसेच उपअभियंता स्वप्नील जसवंते, शरद तिनखेडे आणि मनपाचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये फिशरीज हब ची उभारणी करुन निलक्रांती योजने अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे कोळी लोक, मत्स्य उत्पादक, अमरावती महानगरपालिका क्षेत्रालगत विक्रेते तथा ग्राहक यांना फायदा होणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांनी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ताज्या, थंड आणि गोठलेल्या आणि मुल्यवर्धीत माशांच्या खाद्य उत्पादनांचे व्यापार, गोदाम, प्रक्रिया, वितरण आणि निर्यात यासाठी अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये मत्स्य व्यवसाय हब (फिश फूड हब) मध्ये रुपांतरीत होणार आहे.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी अधिका-यांना सांगितले की, फिशरीज हब




तयार करुन सर्व आवश्यक सुविधा देवून सुविधा पुरविण्यासाठी कार्य करावे. ग्राहकांना दर्जेदार मासे उपलब्धता सुनिश्चित करावी. गुणवत्ता नियंत्रण उपकरणे आणि आवश्यकते सह फिशरीज हब प्रदान करावा. स्थानिक फिशर किंवा मासेंच्या शेतक-यांना आवश्यक असलेल्या सर्व गरजा, सुविधा आणि आधारभुत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. महिलांना सशक्त करणारे ग्रामीण भागात नोकरीची संधी निर्माण करणारा हा प्रकल्प आहे. मत्स्य उत्पादकांना थंड मच्छीचे बाजारपेठ तयार करण्यासाठी आणि आइस्ड आणि गोठलेल्या मासेंच्या उत्पादनासाठी तयार होण्यासाठी मोबाईल व्हेंडींग वाहने, इंटीग्रेटेड मोबाईल फिश व्हेंटीन्सची निर्मिती करण्यासाठी स्वयंरोजगार निर्माण करणारा हा प्रकल्प आहे. पोस्टहार्वेस्ट सुविधा जसे की आईस्कड फिश, प्रीप्रोसेसिंग, फिश ड्रेसिंग आणि मूल्यवर्धित उत्पादनांचे आणि त्यानुरुप उत्पादकांसाठी आणि ग्राहकांना गुणवत्ता उत्पादनांची पूर्तता या प्रकल्पातून होणार आहे. सदर प्रकल्प गतीमान करुन दर्जेदार करावा अश्या सुचना यावेळी दिल्या. हा प्रकल्प मंजुर होण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहे. या प्रकल्पाचे उर्वरीत काम त्वरीत पूर्ण करुन हा प्रकल्प कार्यान्वित करावा.

महानगरपालिकेचे सदर कार्य लोकांना रोजगार निर्माण करणारे असून यंत्रणेने सदर कार्य उत्कृष्टरित्या पूर्ण करावे. फिशरीज हब उभारण्याचे कार्य सुरु असून या ठिकाणी होलसेल व रिटेल फिश मार्केट तयार होत आहे. या ठिकाणी फिश ड्रेसिंग सेंटर, आईस प्लांन्ट, होलसेल शॉप ३०, रिटेल शॉप १०, चिल्ड रुम, आईस रुम तयार करण्याचे काम झाले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी मद्यपान कराल तर होणार कारवाई

## कायद्यासाठी सरकार नेमणार समिती

विदर्भ प्रजासताक
दि.१२अमरावती



### सरकारचा कारभार कासवगतीपेक्षा कमी

यावेळी मुनगंटीवार यांनी गेल्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर सरकारने दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली. एखाद्या गावातील दारू दुकान बंद करण्याबाबत म्हणजे आडव्या बाटलीविषयी सरकारने आश्वासन दिले होते. मात्र, आज चार महिन्यानंतरही या आश्वासनावर निर्णय होत नाही. सरकारचा हा कारभार कासवगतीपेक्षा कमी नाही, अशी टीका मुनगंटीवार यांनी केली.

उद्याने, मैदाने यासारख्या सार्वजनिक ठिकाणी होणारे मद्यपानाचे प्रकार रोखण्यासाठी आमदारांची समिती नेमली जाईल. या समितीची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात येईल. त्यानंतर सहा महिन्यात सार्वजनिक ठिकाणी मद्यपानाला मनाई करणारा कायदा केला जाईल, असे आश्वासन मंत्री आशिष शेलार यांनी दिले.

भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवारी विधानसभेत महाराष्ट्र दारूबंदी सुधारणा अशासकीय विधेयक सादर केले. त्यामधून मुनगंटीवार यांनी सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन होणारे गैरवर्तन टाळण्यासाठी अशा जागी दारू पिण्यास प्रतिबंध करणारा कडक कायदा करावा, अशी मागणी केली. यावर शेलार यांनी सरकारच्यावतीने सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर मुनगंटीवार यांनी विधेयक मागे घेतले.तत्पूर्वी, मुनगंटीवार यांनी सरकारच्या चालढकलपणावर टीका केली. राज्याची अर्थव्यवस्था फक्त दारूवर उभी आहे, असा समज दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्यांनी करून घेऊ नये. आपला दारूबंदी कायदा इतका कमजोर आहे की या कायद्यानेच नशा केली आहे. त्यामुळे कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

# गुरूंचा आशीर्वाद मिळवण्यासाठी धर्माच्या बाजूने उभे राहा- अर्नवेला

## अंबा मंगलम येथे गुरुपौर्णिमा साजरी, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती**- धर्म, राष्ट्र आणि न्याय यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने स्वतःला झोकून देणे, हेच खरे गुरुपूजन ठरेल. प्राचीन काळापासून प्रत्येक वेळी धर्माच्या बाजूने उभे राहणाऱ्यांपेक्षा अधर्मी आणि अन्याय करणाऱ्यांची संख्या आणि शस्त्रबळ अधिक होते. परंतु, अंतिम विजय हा धर्माचाच झाला आहे. कारण भगवंत आणि गुरुतत्त्वाचा आशीर्वाद धर्माच्या रक्षणासाठी कार्यरत असणाऱ्यांवरच असतो. आजही गुरुतत्त्व सनातन धर्माच्या रक्षणासाठी आणि भारताच्या उत्कर्षासाठी कार्यरत आहे. त्यामुळे प्रत्येकाने राष्ट्र आणि धर्माच्या कार्यासाठी झोकून देणे गरजेचे असल्याचे हिंदू जनजागृती समितीचे नागपूर जिल्हा संघटक अतुल अर्नवेला यांनी सांगितले.

राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी साधना आणि युद्धकाळातील कर्तव्ये या विषयावर अंबा मंगलम, बडनेरा रोड सातुर्णा येथे गुरुपौर्णिमा महोत्सवप्रसंगी मार्गदर्शन करत होते.

भारतावर अंतर्गत आणि बाह्य शत्रूंकडून जी आक्रमणे होत आहेत, ती केवळ विस्तारवादासाठी नाहीत, तर हिंदू धर्माला संपवण्यासाठी होत आहेत. पहलगाममध्ये आतंकवाद्यांनी देश विचारून नाही, तर धर्म विचारून गोळ्या झाडल्या. आतापर्यंतच्या दंगलींचा इतिहासही हेच सांगतो की, जेथे धर्मांध माजले, तेथे त्यांनी हिंदूंना, हिंदूंच्या श्रद्धास्थानांना लक्ष्य केले. आज आपण युद्धसदृश अवस्थेत आहोत. हे फक्त सीमांवरील लढाई सारखे वाटत असले, तरी खरे युद्ध हे धर्मयुद्धच आहे, असेही अर्नवेला म्हणाले.

दरम्यान कार्यक्रमाची सुरुवात श्री व्यासपूजन आणि भक्तराज महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म, डॉ. जयंत आठवले यांच्या संदेशाचे वाचन सनातन संस्थेच्या विभा चौधरी यांनी केले. या वेळी सनातन राष्ट्र शंखनाद या विषयावर प्रेरणादायी व्हिडिओचे प्रक्षेपण करण्यात आले. रामराज्य स्थापनेसाठी संकल्प व सामूहिक नाम जपयज्ञ करण्यात आला. तसेच ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशनचे राज्य सचिव महावीर धुळधर यांचा सत्कार गिरीश जामोदे यांच्या हस्ते करण्यात आला. याशिवाय धर्म, अध्यात्म, साधना, बालसंस्कार, आचारधर्म, आयुर्वेद, प्रथमोपचार, स्वसंरक्षण, हिंदू राष्ट्र आदी विषयांवरील ग्रंथप्रदर्शन आणि फलक प्रदर्शन लावण्यात आले होते. तसेच संरक्षण प्रात्यक्षिके, फहलगाम घटनेचे सादरीकरणही करण्यात आले. या वेळी अनेक धर्म व राष्ट्रप्रेमी उपस्थित होते.

दरम्यान, देश-विदेशांतील हजारो भाविकांसाठी मराठी, हिंदी, गुजराती, तमिळ आणि मल्याळम भाषांमध्ये ऑनलाइन गुरुपौर्णिमा महोत्सवांचे आयोजन केले होते. या वेळी अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला. हिंदू राष्ट्राची स्थापना व्हावी, यासाठीची ऊर्जा सर्वप्रथम सनातन संस्थेद्वारे निर्माण झाली आणि ती आता संपूर्ण जगात पोहोचली आहे. सनातन संस्थेचे परात्पर गुरुदेव डॉ. जयंत आठवले यांच्या संकल्पानुसार हिंदू राष्ट्र येणारच आहे. त्यासाठी प्रत्येकाने शास्त्रासह शस्त्र शिकणे गरजेचे आहे. उपस्थित महिलांना त्यांनी स्त्रियांनी स्वतःमधील दुर्गा, चंडिका जागृत करा व दृश्यांचे निर्दालन करा, असे आवाहन धूळधर यांनी केले.



## राज्य आय टी आय येथे १४ जुलै सकाळी राष्ट्रीय शिकाऊी भरती मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती,**

अमरावती राज्य औ प्रशिक्षणे येथील एनएसएस हॉलमध्ये दि. १४ जुलै रोजी, सकाळी १० पॉवर राष्ट्रीय शिकाऊ मला भरती मेळाव्याचे उत्तर देण्यात आले आहे. या भरती व्यावसायामध्ये तसेच अमरावती पात्र स्थानिक नामांकित कंपनीचे सदस्य उपस्थित आहे. आय टी आय उत्तीर्ण सेवक, इच्छुक परीक्षानी या मेळाव्यात उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार आगरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. भरती मेळाव्यात फिटर, वायरमन टार, मशिनिस्ट , वेल्डर, इलेक्ट्रिशियन, कारपेंटर, इलेक्ट्रॉनिक्स, सुइंग टेक्नॉलॉजी, ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलॉजी, कोपा, ट्रॅक्टर मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, आणि मोटर मेकॅनिक, आयटी आय व्यवसाय उत्तीर्ण तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, प्रशिक्षणार्थीनी बायोडाटा व पासवर्डपत्राच्या छायांकित प्रतीसह सहभागी व्हावे. व या सुवर्णाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, औद्यागिक प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी केले आहे.

# आ. रवि राणांकडून पार्डी गावालगतच्या रेल्वे अंडरपासची पाहणी

## गावकरी व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला पर्यायी मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आ.रवि राणा यांनी पार्डी गावाला लागुन असलेल्या रेल्वे अंडरपासच्या सुरु असलेल्या पुलाच्या कामामुळे साचलेल्या पाण्याने नागरिकांना होत असलेल्या त्रासाची तातडीने दखल घेवून आ.रवि राणा यांनी संबंधित अंडरपासला भेट देऊन पाहणी केली.

नागरिकांना होत असलेल्या त्रासाबद्दल जबाबदार असलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना धारेवर धरुन लवकरात लवकर रस्ता मोकळा करुन देण्याचे आदेश देऊन गावकऱ्यांसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिला. त्यामुळे शाळेत जाणारे विद्यार्थी व गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पार्डी गावालगत रेल्वे विभागाच्या वतीने अंडरपास रेल्वेपुलाचे गेल्या अनेक दिवसांपासुन काम सुरु आहे. परंतु गेल्या काही दिवसांपासुन होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अमरावती तालुक्यात अनेक ठिकाणी पाण्यामुळे गावकऱ्यांचा येण्याजाण्याचा मार्ग बंद झाला. यातच पार्डी गावाला लागून असलेल्या रेल्वे अंडरपासचे काम सुरु असल्यामुळे पावसाचे पाणीमोठ्या प्रमाणात पुलामध्ये साचले असल्यामुळे त्या ठिकाणावरुन जाणे येणे गावकऱ्यांना, दहावी व बारावीच्या शाळकरी



विद्यार्थ्यांना कठीण झाले होते व संपुर्ण वाहतुक ठप्प झाली होती. जवळपास १० ते १२ गावांशी असलेले एकमेकासोबतचे वाहतुकीचे मार्ग ठप्प झाले होते. गावकऱ्यांनी अनेकदा अधिकाऱ्यांना सुचना देऊनही कोणत्याही प्रकराची दखल घेण्यात आली नाही. करिता आ. रवि राणा यांना सांगताच आ. रवि राणा यांनी पावसाळी अधिवेशातुन परत येताच तातडीने पार्डीगावालगत असलेल्या रेल्वे अंडरपासला गावकऱ्यांसोबत भेट दिली. तसेच रेल्वेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना त्या ठिकाणी बोलविण्यात आले व सर्व अधिकाऱ्यांना बेजबाबदारपणे काम झाल्याबद्दल धारेवर धरले. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरुन ताकीद दिली. व संबंधित रेल्वेच्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर तातडीने गुन्हे दाखल करण्याचे निर्देश सुद्धा दिले. व लवकरात लवकर अंडरपासमधिल साचलेल्या पाण्याचा उपसा करुन गावकऱ्यांचा वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्याचे सुद्धा आदेश दिले. यावेळी आ.रवि राणा यांनी स्वतः उभे राहुन गावकऱ्यांना जाणेयेण्यासाठी पर्यायी मार्ग सुद्धा उपलब्ध करुन दिला.आ. रवि राणा यांनी या समस्येची तातडीने दखल घेवून गावकऱ्यांसाठी मार्ग मोकळा करुन दिल्याबद्दल सर्व गावकऱ्यांनी आ. रवि राणा यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबतच तहसिलदार विजय लोखंडे, श्री काळे, ठाणेदार सुनिल चव्हाण, बंडु डकरे, अजय घुले पार्टी सरपंच अक्षय मेश्राम, ओकांर मोहोड, विजय इंगोले, उद्धव कराडे, जितेंद्र भस्मे, मनोहर पिसे, उदखेड संरपंच सुभाष खंडार, मनोहर मारोडकर, प्रविण अरक, गजानन मेश्राम, निलेश महल्ले, अमोल पिसे, प्रविण ठेंबरे, राहुल ठेंबरे, राहुल मेश्राम, सुनिल राऊत, अजय गंगात्रे, जगदिश अंबाडकर, प्रदिप निचत, सुभाष इंधाने, छोटु इंधाने, सुरेश इंधाने, रमेश माकडे, नितीन बेंडे, तलाठी प्रिती कराडे, ग्रामसेवक ओम विरुळकर आदि उपस्थित होते.

# बिच्छन नदीच्या डोहामध्ये बुडून २ चिमुकल्यांचा मृत्यू

## मृत दोन्ही मुले बुरडघाडची, गावात हळहळ व्यक्त





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२परतवाडा**

अचलपूर तालुक्यातील बुरडघाट गावातील दोन मुले त्यांच्या मित्रांसोबत बिच्छन नदीत अंघोळीसाठी गेले होते. या वेळी नदी पात्रातील डोहात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यु झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी तीन ते साडेतीन वाजताच्या सुमारास बुरडघाट गावापासून काही अंतरावर घडली. हे घटनास्थळ मध्य प्रदेशातील भैसदेही पोलिस ठाण्याच्या हद्दीत येते.

बुरडघाट येथील भावेश रवी चौरासे (११) आणि दीपक तुलसीदास ब्राम्हणे (१०) असे डोहात बुडालेल्या चिमुकल्यांची नावे आहेत. ते एकमेकांचे आतेभाऊ मामेभाऊ आहेत. हे दोघे ११ जुलैला गावापासून जवळच असलेल्या बिच्छन नदीत गेले असता, या दोघांचा बुडून मृत्यू झाल्याची माहिती गावात मिळाली. ही माहिती मिळताच चौरासे व ब्राम्हणे कुटुंबावर शोककळा पसरली. गौरखेडा कुंभी येथील एका खासगी शाळेत भावेश पाचव्या तर दीपक चौथ्या वर्गात शिकत होता. शुक्रवारी गावातील काही लहान मुले नदीत अंघोळीला गेले होते. हे दोघे बुडाल्याने तिघे गावात परत आले व त्यांनी याबाबत गावकऱ्यांना माहिती दिली. माहिती होताच ग्रामस्थ व नातेवाइकांनी घटनास्थळ गाठून या मुलांना बाहेर काढत अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्या दोन्ही मुलांना मृत घोषित केले.ही घटना शुक्रवारी दुपारी तीन ते साडेतीन वाजताच्या सुमारास बुरडघाट गावापासून काही अंतरावर घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.गाळात फसल्याचे बघून दुसरा वाचवायला गेला भावेश आणि दीपक यांच्यापैकी एक जण पहिल्यांदा डोहातील गाळात फसला, हे दुसऱ्याला लक्षात येताच तो त्याला वाचवण्यासाठी गेला. मात्र तोही गाळात अडकला आणि दोघांचाही मृत्यू झाला. हा डोह महाराष्ट्राच्या सीमेपासून अवघ्या ५० फूट अंतरावर मध्य प्रदेशच्या सीमेत जात असल्याचे अचलपूर पोलिसांनी सांगितले आहे.

# एक वर्षापासून शिवभोजन केंद्राची तपासणी नाही

## प्रशासनाचे दुर्लक्षःआहाराची गुणवत्ता अन्न व औषध विभागाने तपासावी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बुलढाणा -**

जिल्हयात एकवीस शिवभोजन केंद्र सध्या कार्यरत असून येथील जेवणाचा दर्जा कसा असतो, तेथील व्यवस्था कशी आहे, पिण्याचे पाणी दुषित आहे की शुद्ध आहे. याची गुणवत्ता, नमुने किंवा पडताळणी गेल्या वर्षभरापासून झालेली नाही. यासह इतरही सार्वजनिक ठिकाणी अन्न पदार्थाचा दर्जा, गुणवत्ता तपासण्यात आली नाही. त्यामुळे शासन फक्त ठेकेच देण्याचे काम करत आहे. मात्र तपासणी करुन कारवाई करत नसल्याचे दिसत आहे.

गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने दि. १ जानेवारी,२०२० रोजीच्या



शासन निर्णयान्वये शिवभोजन योजना दि. २६ जानेवारी २०२० पासून सुरु केली आहे.

शिवभोजन थाळीमध्ये दोन चपात्या, एक वाटी भाजी, एक वाटी वरण व एक मूद भाताचा समावेश आहे. शिवभोजन योजना कार्यान्वित करण्यासाठी शिवभोजन प्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. त्याचा वापर करुनच शिवभोजन थाळी वितरीत करण्यात येते. शिवभोजन थाळ्या वितरीत करण्यापूर्वी लाभार्थ्याचे नाव व फोटो घेणे बंधनकारक आहे तर, फोन नंबर वैकल्पिक आहे. या पवर शिवभोजन केंद्र चालकास रोजचा मेन्यू प्रसिद्ध करता येतो.

शासनाच्या अशा निर्देश व नियमानुसार शिवभोजन दिल्या जात असेलही परंतु, अन्न व औषध प्रशासनाने शिवभोजनाची तपासणी करावी, अशा सुचना नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनानेही हॉटेलची तपासणी करताना शिवभोजन केंद्राचीही तपासणी करावी, अशी मागणी सर्वसामान्यांतून होत आहे.

> ऑक्टोंबर महिन्यात बुलडाणा येथे मी रुजू झालो होतो. त्यानंतर एकही शिवभोजनची तपासणी करण्यात आलेली नाही. त्यापुर्वी झाल्याची माहिती आपल्याला नाही.परंतु, त्यापुर्वीही तपासणी झाली नाही.
>
> **- प्रमोद देवकाबाई शिवलाल पाटील,** सहायक आयुक्त अन्न, बुलडाणा.

# मोर्शीत पुन्हा फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्याला लुटले

## मोर्शी – वरूड मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मोर्शी**

शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली एका प्रायव्हेट फायनान्स कंपनीची ३१ हजार रुपयाची रक्कम बँकेत जमा करण्यासाठी जात असलेल्या फायनान्स कर्मचाऱ्याला अज्ञात चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून लुटून नेल्याची घटना शुक्रवार ११ जुलै रोजी दु. २:३० वाजताच्या सुमारास मोर्शी वरूड रस्त्यावर असलेल्या संकटमोचन हनुमान मंदिराजवळ घडली.

हैदराबाद येथील इ रजिस्ट्रीद्वारा संचालित एका प्रायव्हेट कंपनीच्यावतीने हिवरखेड परिसरातील शेतकऱ्यांना कृषी साहित्यासह पेरणीसाठी नगदी पैसे पुरविण्यात आले. त्या रकमेची परतफेड म्हणून रोहनखेड येथील



फायनान्स कंपनीचा कर्मचारी निखिल जानराव तायडे (२९) याने शेतकऱ्यांकडून वसूल करून आणलेली जवळपास ३० हजार ८०० रुपयांची रक्कम हिवरखेड येथून मोर्शीला आपल्या मोटरसायकलने बँकेत भरण्यासाठी जात असताना मायवाडीनजीक असलेल्या संकटमोचन हनुमान मंदिराजवळ सदर कर्मचारी लघुशंकेसाठी थांबला होता. दरम्यान दोन अज्ञात इसम तोंडाला दुपट्टा बांधून त्या ठिकाणी आले व निखिल तायडे याला चाकू दाखवून त्याच्याकडून ३० हजार ८०० रुपयांची रोकड हिसकावून घटनास्थळावरून पळ काढला. लगेच फायनान्स कंपनीचा कर्मचारी याने मोर्शी पोलिसस्टेशनमध्ये धाव घेऊन आपली फिर्याद नोंदविली. मोर्शी पोलिसांनी या गंभीर घटनेप्रकरणी ठाणेदार सूरज बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात येत आहे.दहा ते पंधरा दिवसांअगोदर मोर्शी शहरात भरदुपारी एका फायनान्स कंपनीचे पैसे भारतीय स्टेट बँकेत जमा करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना चाकूच्या धाकावर जवळपास १३ लाखांनी लुटल्याची घटना घडली होती. त्याअगोदर पोलिस असल्याची बतावणी करून एका वयोवृद्ध इसमाचा सोन्याचा गोफ व अंगठी लुटण्याचा प्रकार घडला होता.

# आझाद हिंद मंडळात गुरुपौर्णिमा उत्सव

## खा. बळवंत वानखडे यांच्या हस्ते देशमुख यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आझाद हिंद मंडळ बुधवारा येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात मनीष देशमुख यांना दिल्ली येथे योगरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल खा. बळवंत वानखडे यांच्याहस्ते देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.महाराष्ट्र योग शिक्षक व आझाद हिंद संघ मंडळद्वारा गुरुपौर्णिमा दिवस साजरा करण्यात आला. प्रथम पतंजलीच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.त्यानंतर गुरुचे स्थान हे किती महत्त्वाचे आहे. यावर सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. नंतर सर्वांना पेठे, बर्फी वाटपकरण्यात आली.याप्रसंगी महाराष्ट्र योग शिक्षक संघ अमरावती माजी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र गवळी, राज्य सचिव मनिष देशमुख, शहराध्यक्ष हेमलता पवार, उपाध्यक्ष भालचंद्र अजमिरे, सचिव अर्चना हिवसे, राधा इंगोले, वैशाली तायडे, धनश्री चांदोळे, पूजा हिवसे,कोमल कोलांडे, अविनाश भुयार, चित्रा पुसदकर, माधनी काशीकर, कल्पना इंगोले, हेमलता पवार, रेखा, अजमिरे, भालचंद्र अजमिरे, मीना वर्मा, प्रिया सोईतकर, सुषना खडेकार, सुनंदा मल्ल, जया जावरे, सुनदा पतंगराय, सरिता पंत, सौ. कीर्ती पंत, सौ. अर्चना हिवसे, सौ. साधना बुराटणे, सौ. अर्चना चांदोळे, सौ. माधवी खोपे सौ. हर्षा गंद्रे, प्रकाश गायकवाड, अलका चांदोळे, सौ. संजीवनी वानखेडे, विजय इंगोले, सौ. अर्चना इंगोले, सौ. अलका विधळे, सौ. अनिता गुलालकारी, सौ. वर्षा चौधरी यांच्यासह संपूर्ण सदस्य तसेच योगप्रेमी उपस्थित होते.

# ऐतिहासिक 'शकुंतलेचा' ब्रॉडगेज प्रकल्प रखडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२पथ्रोट**

१११ वर्षांपूर्वीची ही ऐतिहासिक रेल्वे ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित करून विकसित करण्यासाठी काही वर्षांपूर्वी हालचाली सुरू झाल्या होत्या; मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हा प्रकल्प मागे पडला आहे.अमरावतीचे तत्कालीन खासदार सुदाम देशमुख यांनी शकुंतला नामकरण केलेली ही रेल्वेगाडी मागील एप्रिल २०१७पासून पुलांच्या दुरुस्तीच्या नावावर बंद करण्यात आली. तेव्हापासून नागरिक शकुंतला सुरू होण्याची वाट पाहत आहेत. गोरगरिबांची जीवनदायिनी म्हणून ओळख असलेली शकुंतला रेल्वे सुरू झाल्यास अचलपूर, दर्यापूर, मूर्तिजापूर,यवतमाळसह विदर्भाच्या अर्थकारणाला बूस्टर डोस मिळू शकतो, त्यासाठी राज्यकर्त्यांची इच्छा असणे गरजेचे आहे.ब्रिटिशांनी पूर्वी साधन उपलब्ध नसल्याने अचलपूरसह यवतमाळ व विदर्भातील कापसाच्या गाठीतसेच इमारतीचे लाकूड मॅचेस्टरला घेऊन जाण्यासाठी खरे तर ही रेल्वे सुरू केली होती. रेल्वेने हा कापूस मुंबईला जायचा आणि मग पुढे जहाजाने तो इंग्लंडला पाठविला जात



असे.सुरुवातीला स्टीम इंजिन होते. त्यानंतर १९९४ मध्ये स्टीम इंजिनच्या जागी डिझेल इंजिन आले. त्यानतर २०१६ मध्ये ही रेल्वे ब्रिटिशांच्या मालकीतून मुक्त झाली आणि त्यानंतर तिचे धावणेही थांबले. या रेल्वेलानॅरोगेजमधून ब्रॉडगेजमध्ये परावर्तित करून ती पुन्हा सुरू करण्याची मागणी आहे. शकुंतला वऱ्हाडवासींची पहिली पसंती. वऱ्हाडात मुबलक पिकणारा कापूस मुंबईत आणि तेथून मॅवेस्टरच्या सूतगिरण्यांना पुरविण्यासाठी या रेल्वेलाईनची इंग्रजांनी उभारणी केली होती. त्यांनी त्यांच्या फायद्यासाठी ही लाईनउभारली, तरी या शकुंतलेने लवकरच वऱ्हाडवासींना आपलेसे केले अतिशय कमी तिकिटामुळे खेड्यापाड्यातील नागरिकांचीती पहिली पसंती होती. ज्या विसाव्या शतकाच्या प्रारंभी वऱ्हाडात वाहतुकीची कुठलीही साधने नव्हती, त्या काळात येथील छोट्या–मोठ्या गावांना बाहेरच्या जगाशी जोडणारी अशी ही शकुंतला रेल्वे होती.

# ले–आउट नोंदीच्या ठरावाला नकार; प्रोसेडिंगमध्ये होकार

## शिरजगाव बंड ग्रामपंचायतीमधील प्रकार ग्राम : विकास अधिकारी यांचा प्रताप : बीडीओंकडे ठराव रद्द करण्यासाठी तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चांदूरबाजार :**

ले–आउट नोंदीच्या ठरावाला दोन सदस्यांचा नकार असताना मात्र प्रोसेडिंगमध्ये त्यांचा होकार दाखविण्यात आला आहे. हा प्रकार शिरजगाव बंड येथील ग्रामविकास अधिकाऱ्यांनी केल्याचा आरोप करीत त्यांच्या विरोधात बीडीओंकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.ग्रामपंचायतीमध्ये २६ जून रोजी मासिक सभेचे आयोजन केले होते. सरपंचा नंदा वाकोडे यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरुवातकरण्यात आली. विषयावरील चर्चेनुसार ठराव क्रमांक १० मध्ये भारती दिनेश कटारीया व इतर सर्व्हे नं.४/१ शिरजगांव बंड येथील एकुण क्षेत्र ०.८१ हे या भुखंडाची नोंद घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. सदर भूखंडामध्ये अद्यापही पूर्ण सोई सुविधा नसल्यामुळे प्लॉट नोंदणी विषयाला मासिक सभेमध्ये हजर असलेले ग्रामपंचायत सदस्य अस्माबानो मो. मुदस्सीर व केसर पूनकर यांनी विरोध केला. मात्र ग्रामविकास अधिकारी येवले यांनी ठरावाच्या बाजूने असल्याचे त्यांचे मत लिहून मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाची (१९५८) पायमल्ली केली व सदस्याची सुद्धा दिशाभूल करून ठराव मजूर केला. मासिक सभेमध्ये ले–आऊट मधील ५४ प्लॉटची नोंदणी करण्याकरिता ठरावाच्या बाजूने बहुमत नव्हते. तार सुद्धा ग्रामपंचायत सदस्य अस्माबानो मुदस्सर व केशर पूनकर यांचा होकार असल्याचे ठरावाच्या बाजूने लिहून या दोन सदस्यांची दिशाभूल तर केलीच तर रुकसानाबी बली शहा यांचे मत ठरावाच्या विरुद्ध असून सुद्धा तटस्थ ठेवण्यात आले. तसेच ग्रामपंचायत सदस्य विशाल बेले यांनी मासिक सभेत सूचित केलेले ले–आऊट मधील असुविधा असल्याचाबतचे मत सभेत चर्चेत घेतले ते मत ग्रामविकास अधिकारी यांनी प्रोसेडिंग मध्ये नोंदविले नाही. असे विविध नियमबाह्य कामे केल्याचे तक्रारीत नमुद आहे. त्यामुळे तक्रारीची तात्काळ चौकशी करून नियमबाह्य केलेला ठराव रद्द करून ग्रामविकास अधिकारी पी.पी. वेवले यांचेवर तत्काळ कारवाई करावी व त्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी केशर पुनकर, अस्माबानो मुदस्सीर रुकसानाबो वलीशहा व विशाल बेले यांनी केली आहे.

# दर्यापुरातील मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांचा 'ठिय्या'

## युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांची तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**

दर्यापूर शहरात गेल्या कित्येक वर्षांपासून मौकाट जनावरांच्या समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माणझाल्या आहेत. रस्त्याच्या मधोमध मोकाट जनावरे निद्रा करत असून त्याचा परिणाम वाहतुकीवर होत असताना दिसत आहेर अगोदरच रस्ते अरुंद असल्याने वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

पालिका प्रशासनासह मोकाट जनावरांच्या मालकांनी याची विल्हेवाट लावणे गरजेचे बनले आहे. केवळ जनावरे आपल्या मालकीची असताना त्या जनावरांचा सांभाळ करणेसुध्दा तितकेच महत्त्वाचे बनले आहे. पालिका प्रशासनाने व संबंधित विभागाने या अति महत्त्वाच्या बाबीची दखल घेऊन जनावरांच्या मालकांना ताकीद द्यावी, जेणेकरून रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही व जनावरांचेअपघात होणार नाही, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी नगरपरिषद कार्यालय दर्यापूर यांना केली आहे.



दर्यापूर शहरातील मुख्य मार्गावर मोकाट जनावरांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने वाहतुकीस अडचले निर्माण होत आहेत. नगरपरिषद विभागाने त्वरित लक्ष घालून होणाऱ्या अपघातापासून कायमस्वरूपी सुटका करावी.

**प्रदीप वडतकर,**
**शिवसेना जिल्हा समन्वयक**

# जिल्ह्यातील ११,६५६ असाक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट

## १५ जुलैपर्यंत शोधमोहीम शाळाबाह्य व स्थलांतरित विद्यार्थ्यांचेही सर्वेक्षण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

केंद्र पुरस्कृत 'उल्लास नवभारत साक्षरता' कार्यक्रमांतर्गत २०२५–२६ या वर्षात ११ हजार ६५६ इतके असाक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट जिल्ह्याला देण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा परिषद व महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून या असाक्षर व्यक्तींची शोधमोहीम सुरू असून, १५ जुलैपर्यंत हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. दरम्यान, यासोबतच शाळाबाह्य व बाहेर जिल्ह्यातून स्थलांतरीत झालेल्या विद्यार्थ्यांचेही सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

शासनाच्यावतीने २०२२ ते २०२७ या पाच वर्षांच्या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्यानुसार साधारणतः १५ वर्षांपेक्षा अधिक वय असणारे व प्रामुख्याने प्रौढ किंवा वयोवृद्ध व्यक्तींना साक्षर करण्याचे उद्दीष्ट आहे. याअंतर्गत स्वयंसेवक किंवा सुशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत संबंधित असाक्षरांना किमान शिक्षण दिले जाते. त्यानंतर त्यांची परीक्षाही घेतली जाते. यासाठी आता हे सर्वेक्षण सुरू आहे. या असाक्षर व्यक्तींची नोंदणी 'उल्लास' ॲपवर करण्यात येणार आहे.दरम्यान, प्रौढ असाखरांसोबतच शाळाबाह्य व बाहेरून स्थलांतरीत झालेल्या १८ वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठीही घरोघरी,बसस्थानक, रेल्वेस्थानक, सिग्नल्स, हॉटेल, सार्वजनिक ठिकाणे, वीटभट्टया, वाड्या, वस्त्या, तांडे, या ठिकाणी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत आहे. स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक बालकांना शिक्षण हमी कार्डहीदेण्यात येणार आहे. प्रामुख्याने १५ जुलैपर्यंत हे सर्वेक्षण होणार असले, तरी ही प्रक्रिया वर्षभर चालू ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी दिले आहे.

**असाक्षरांचे तालुकानिहाय उद्दिष्ट**

अमरावती ग्रामीण ७५४, महापालिका क्षेत्र –९६३. अचलपूर ७५५, अंजनगाव सुर्जी ६१५, भातकुली – ७१०, चांदूर रेल्वे ५८६, चांदूर बाजार ८०६, चिखलदरा ७५२, दर्यापूर ६१०, धामणगाव रेल्वे ७५८, धारणी १,५३९, मोर्शी – ६१४, नांदगाव खंडेश्वर वरुड– ७५६, एकूण–११,६५६ ६८४, तिवसा ७५४,

# स्वच्छ भारत मिशनला ११ महिन्यानंतर नियमित डेप्युटी सीईओ मिळाले

## दोन डेप्युटी सीईओंची पदे रिक्तच बाळासाहेब रायबोले यांनी पदभार स्वीकारला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती:**

स्वतंत्र भारत मिशनला अकरा महिन्यानंतर नियमित उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिळाले आहे.गुरुवारी बाळासाहेब रायबोले उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे सांभाळली. जिल्हापरिषदेत अद्यापही सामान्य प्रशासन विभाग व मनरेगा या दोन विभागाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या खांद्यावर आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी यांची सप्टेंबर २०२४ मध्ये बदली झाल्यानंतर तब्बल ११ महिन्यांपासून येथील कारभार प्रभारी होती.मधल्या काळात बीडीओ प्रफुल्ल भोरखडे व त्यानंतर संजय खारकर यांनी या विभागाचा प्रभार सांभाळला. या रिक्त जागी यवतमाळ जिल्ह्यातील बदली होवून आलेले बाळासाहेब रायबोलेयांनी बीडीओचा कारभार सांभाळला. जिल्ह्यातील विविध पंचायतसमित्यांमध्ये जबाबदारी सांभाळत त्यांना भारत स्वच्छता मिशनची जबाबदारी मिळाली आहे.जिल्हापरिषदेत सद्या सामान्य प्रशासन आणि मनरेगा या दोन विभागात उपमुख्य कार्यकारी अधिकारी केव्हा मिळणार, याची प्रतीक्षा लागली आहे.

# बडनेरा शहरामधील रस्ते बनले वाहनतळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बडनेरा**

अमरावती–बडनेरा शहरातून जाणारे रस्ते रुंदीकरण करून मोठे केले; परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजूने चारचाकी वाहनाच्या रांगा लागत असल्याने सार्वजनिक रस्त्याला वाहन तळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना, तसेच वाहन चालकांच्या दोन्ही बाजूने वाहन उभे असल्यामुळे वाहतूकीला अडथळा



निर्माण होत आहे.शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंट रस्ते तयार केले; परंतु याचा फायदाशहरातील दुकानदार तसेच मुख्य रस्त्यावर जागोजागी मार्गावर चार चाकी वाहने उभे केले आहे. चारचाकी वाहनाच्या रांगाच रांगा रस्त्यावर पाहावयास मिळतात. यामुळे अपघाताला कारणीभूत असल्याचे दिसून येते. याकडे संबंधित वाहतूक विभाग दुर्लक्ष करत आहे. तरी प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याने दिसून येत आहे. रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली जात आहे.

# कृषी भवन व पेट्रोल पंपावर आता उपसमितीचे नियंत्रण : दर्यापूर बाजार समितीचा निर्णय

## कारभार पारदर्शक करण्याचा सभापतींनी व्यक्त केला मानस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषी भवन व पेट्रोलपंप यावर नियंत्रन ठेवण्याकरिता उपसमितीचे गठण करण्यात येणार आहे. त्यामुळे येथील कारभार हा पारदर्शक होईल असे मत बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

कृषी भवन भाड्याची रितसर पावती मिळत नसल्याची तक्रार बाजार समितीला प्राप्त झाली



असून हा प्रकार गैरसमजाने झाला आहे. सदर तक्रारतकत्यांची सर्व रक्कमेची पावती बाजार समितीमध्ये तयार असून येथे कुठल्याही प्रकारचा अपहार नाही. भाड्याचे पैसे सुरक्षित असल्याचे मत सभापती व संचालकांनी यावेळी व्यक्त केले. भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारी थांबविण्याकरिता आता पेट्रोलपंप व कृषी भवनाच्या व्यवहारावर लक्ष ठेवण्याकरिता उपसमिती स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे यामध्ये पारदर्शकता राहील असा विश्वास देखील सभापती सुनील गावंडे यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना व्यक्त केला. बाजार समितीमध्ये संचालक मंडळाच्या सहकार्याने बाजार समिती प्रगतीपथावर जात आहे. तसेच अडगळीत पडलेले कृषी भवन दुरुस्ती करुन शेतकरी, गोरगरीबआदींना कमी दरात मागील काही महिन्यांपासून उपलब्ध झाले आहे. याला देखील नागरीकांचा मोठा प्रतिसाद असल्याचे पत्रकार परिषदेतून सभापतींनी सांगितले. माझ्या कारकिर्दीत एक रुपयाचाही घोळ होणार याची शाश्वती देखील सभापतींनी यावेळी दिली. त्यामुळे तक्रारकर्त्यांनी बाजार समितीची बदनामी न करता संचालक मंडळाला भेटून गैरसमज दूर करावा, असे आवाहन पत्रकार परिषदेतून करण्यात आले. पत्रकार परिषदेला उपसभापती श्रीकृष्ण कराळे यांचेसह संचालक साहेबराव भदे, राजेशशेठ राठी, प्रभाकर तराळ, डॉ. अभय गावंडे, भारत आठवले, असिफ खान उपस्थित होते.

# ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक म्हणजे 'जीवनदूत'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक हे केवळ प्रशिक्षण देणारे शिक्षक नसून, ते कुशल वाहनचालक घडवून अपघातांचे प्रमाण कमी करणारे 'जीवनदूत' आहेत, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले.प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा व शहरातील ड्रायव्हिंग स्कूल संचालकांसाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या वेळी प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विपिन लेदाडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवशंकर कातडे आणि सोहम हेमने उपस्थित होते.प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना वाहनाचे तांत्रिक ज्ञान, रस्त्यावरील चिन्हांची माहिती, समृद्धी महामार्गासारख्या महामार्गांवर वाहन कसे चालवावे, वेग किती ठेवावा, घाट रस्ते व रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंगचे नियम याचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.प्रत्येक प्रशिक्षकाने प्रशिक्षणाच्या वेळी ओळखपत्र बाळगावे. वाहन प्रशिक्षण काळात योग्य सूचना व मार्गदर्शन केल्यास अपघातांवर नियंत्रण मिळवता येईल, असेही त्यांनी नमूद केले.कार्यशाळेत ड्रायव्हिंग स्कूल संचालकांच्या अडचणींवर चर्चा होऊन त्यांचे निराकरण करण्यात आले. हा उपक्रम प्रथमच राबविल्याबद्दल सर्व संचालकांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.

# दिव्याखालीच अंधार, शेतकऱ्यांसाठी आग्या मोहोळ उठवणाऱ्या बच्चू कडूंच्या प्रहारची कोंडी

## अकोला जिल्हाध्यक्षावर ज्वारी खरेदीत भ्रष्टाचाराचा आरोप : आमदार अमोल मिटकरींनी विधान परिषदेत वेधले लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अकोला**

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रहारचे नेते बच्चू कडूंच्या उपोषण आणि पदयात्रेने महाराष्ट्र ढवळून निघालाय. मात्र, बच्चू कडूंच्या प्रहार पक्षाचे अकोला जिल्हाध्यक्ष कुलदीप वसु यांच्यामूळे पक्ष अडचणीत आला आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट बाजार समितीच्या ज्वारी खरेदीत वसु यांच्या फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीने शेतकऱ्यांच्या नावाने फसवणूक केल्याचा आरोप झाला आहे.

राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींनी विधान परिषदेत या घोटाळ्यावर लक्ष वेधलं आहे. त्यानंतर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे एकीकडे पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू शेतकऱ्यांसाठी सरकारला धारेवर धरत असताना दुसरीकडे मात्र त्यांच्याच



### काय सांगते आकडेवारी?

तब्बल ५,१,२७क्विंटल ज्वारी खरेदी
शेतकऱ्यांकडून १५००-२००० रुपये दराने ज्वारी खरेदी.
सरकारकडे विक्री ३५०० च्या हमीभावाने
सरळसरळ लाखो रुपयांचा गैरव्यवहार!

पक्षातील पदाधिकाऱ्यावर फसवणूक केल्याचा आरोप होत असल्याने बच्चू कडू यांच्या पक्षाची कोंडी झाली आहे.

राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींनी विधान परिषदेत या घोटाळ्यावर लक्ष वेधलं आहे. त्यानंतर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे एकीकडे पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू शेतकऱ्यांसाठी सरकारला धारेवर धरत असताना दुसरीकडे मात्र त्यांच्याच पक्षातील पदाधिकाऱ्यावर फसवणूक केल्याचा आरोप होत असल्याने बच्चू कडू यांच्या पक्षाची कोंडी झाली आहे.

अकोला जिल्ह्यातील अकोट बाजार समिती राज्यभर चर्चेत आली ती ज्वारी खरेदी घोटाळ्याच्या आरोपामुळे. हमीभावान ज्वारी खरेदीसाठी करण्यात आलेला बनावट व्यवहार या चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.आणि या सगळ्याचा थेट संबंध प्रहार पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाशी जोडला जात आहे. या घोटाळ्यात संत नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्युसर कंपनी या संस्थेचं नाव समोर आलं आहे. ही संस्था प्रहार जनशक्ती पक्षाचे अकोला जिल्हाध्यक्ष कुलदीप वसु यांच्या अध्यक्षतेखालील आहे. या ज्वारी खरेदीत भ्रष्टाचार झाल्याची तक्रार वंचितचे नेते निखिल गावंडे यांनी केली.

**नेमकं प्रकरण काय ?**

बाजार समितीने नोडल एजन्सी म्हणून तालुका खरेदी-विक्री संघ आणि कुलदीप वसु अध्यक्ष असलेल्या संत नरसिंग महाराज फार्मर्स प्रोडच्युसर कंपनीची नेमणूक केली होती. यात संत श्री नरसिंग महाराज फार्मर्स प्रोडूसर कंपनीकडे जवळपास ११०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. तर खरेदी-विक्री संघाकडे १२००च्या जवळपास शेतकऱ्यांनी खरेदीसाठी नोंदणी केली होती. यात वसू यांच्या कंपनीच्या माध्यमातून १८०च्या जवळपास शेतकऱ्यांच्या नावाने बोगस ज्वारी खरेदी झाल्याचा आरोप होतो आहे.अकोट तालुक्यातील जळगाव नहाटेच्या रामेश्वर साबळे यांनी ज्वारी विक्रीसाठी नोंदणी केली आहे. मात्र त्यांचा नंबर लवकर न लागल्यामुळे त्यांना आपली ज्वारी कमी व्हावी, म्हणून त्यांना व्यापाऱ्याला विकावी लागली आहे. अन् हक्काच्या ३५०० च्या हमीभावावर त्यांना पाणी सोडावं लागलं आहे. विधान परिषदेत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींनी यावर थेट आवाज उठवला आहे. यावर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी एसआयटी चौकशीची घोषणा केली आहे.

# मेळघाटातील अवैध धंद्या विरोधात भाजप जिल्हाध्यक्ष आक्रमक : पालकमंत्र्यासह जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडून समस्येवर तोडगा काळात कारवाईचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी**

मेळघाटातील धारणी चिखलदरा तालुक्यात आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरिता शासनाने अनेक उपाययोजना राबविल्या परंतु त्या उपाययोजनेचा कोणताही फायदा दोन्ही तालुक्यातील आदिवासी बांधवांना होत नसून त्या योजनेतून मिळणारे थेट लाभाचे पैसे आदिवासी बांधव वरली मटका जुगार लॉटरी अवैध दारू गांजा यात घालून घरात दरिद्री ,गरिबी ,आदिवासी बांधवांची मुले शिक्षणापासून वंचित आहे त्यासह महिलाणा मानसिक त्रास होत आहे याला सर्व जबाबदार मेळघाटातील अवैध धंदे असल्याचे बोलल्या जात असल्याने मेळघाटचे माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांनी आक्रमक होत अवैध धंध्या विरुद्ध एल्गार पुकारला असून त्याबाबत जिल्हाधिकारी पालकमंत्र्यांकडे लेखी तक्रार दिली आहे.

मेळघाट क्षेत्रामध्ये ८०% जनसंख्या ही आदिवासी बांधवांची आहे तर २० टक्के जनसंख्या ही गैर आदिवासी बांधवांची आहे मेळघाट हा अतिदुर्गम भाग असल्याने येथील गोरगरीब आदिवासी बांधव मोलमजुरी करून कसेबसे




आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात त्यासह भाजप सरकारच्या काळात या आदिवासी बांधवांना मिळणाऱ्या शासनाच्या अनेक योजना त्यांच्या घरापर्यंत पोहोचत नाही त्या योजनेतून मिळणारा थेट लाभाचा पैसा हा आदिवासी बांधव तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यात त्यामध्ये वरली मटका जुगार अवैध दारू लॉटरी यामध्ये खर्च करून स्वतःच्या घरात गरिबी दरिद्री निर्माण करतात त्याचा त्रास सहन करत मुलांना शिक्षणासाठी पैसा नाही महिलांचे शोषण यासारख्या आदिवासी महिला समोर उद्भवतात ही बाब शासन व प्रशासनाच्या लक्षात आणून देण्याकरिता भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांनी मेळघाटातील अवैध धंद्याविरोधात एल्गार पुकारत अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे लेखी तक्रार देऊन मेळघाटातील अवैध धंदे बंद करण्याबाबत एलगार पुकारला त्यासाठी गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांनी तालुक्यातील आदिवासी संघटना महिला संघटना यांचे प्रतिनिधी बोलवून स्थानिक रंगभवन हॉलमध्ये मीटिंग घेतली असता तेथे उपस्थित आदिवासी संघटनेचे अध्यक्ष सुरेश पटेल, रामगोपाल मावसकर ,दिलीप जावरकर, सदाशिव खडके, श्याम गंगराळे महिला प्रतिनिधी दुर्गा बिसंदरे माजी नगरसेविका रेखा पटेल ,क्षमा चौकसे मालती कासदेकर सह अनेक आळा पटेल सर्व आदिवासी संघटनेच्या बांधवांनी अवैध धंद्याविरोधात समस्येचा पाढा च त्यांच्याकडे मांडला त्यामुळे आता हे अवैध धंदे मेळघाटातून हद्दपार करण्याची जबाबदारी प्रभुदास भीलावेकर यांनी स्वीकारली असून त्याबाबत ते शासनाकडे पाठपुरावा करत आहे

# जिल्ह्यात ५० हजार २८९ मतदार वाढले

## जिल्हा प्रशासनाने आयोगाला पाठविली मतदार यादी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी १ जुलैपर्यंतची मतदारयादी वापरली जावी, असे नियोजन राज्य निवडणूक आयोगाने केले असून तसे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने १ जुलैची अर्हता दिनांक गृहित धरीत आयोगाकडे मतदारयादी पाठविली आहे.यामध्ये अमरावती महापालिका क्षेत्र वगळता जिल्ह्यातील शहरी व ग्रामिण भागात १९ लाख ८ हजार ६१२ मतदार आहेत. विधानसभेनंतर जिल्ह्यात ५० हजार २८९ मतदार वाढले आहेत.जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायतीच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात आयोगाने व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी मतदारयादी होती, ती राज्य निवडणूक आयोगाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयातून गेल्या महिन्यात मागितली होती. त्यावरून या यादीच्या आधारेच मतदान होणार असे म्हटले जात होते. मात्र त्यानंतर मोठ्या प्रमाणात मतदारांची नोंदणी झाल्याने ते मतदानापासून वंचित राहू नये याकरिता आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निववडणुकीकरिता राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ पर्यंतच्या याद्या केंद्रीय निवडणूक आयोगास मागितल्या आहेत, जिल्ह्यात ग्रामिण भागात विधानसभेच्या यादीत १५ लाख ३ हजार



६३ मतदारांचा समावेश होता. १ जुलैपर्यंत यामध्ये वाढ होत १५ लाख ४९ हजार ७४४ मतदार झाले आहेत. यामध्ये ४६ हजार ६३ मतदार वाढले आहेत.तसेच नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात विधानसभेमध्ये ३२ लाख ५४ हजार ४२ मतदार असताना १ जुलै रोजी मतदार संख्या ३ लाख ५८ हजार ८६८ एवढी झाली आहे. ग्रामीण आणि शहरी भागात वा आठ महिन्यांमध्ये५० हजार २८९ मतदार वाढले आहेत. १ जुलैच्या मतदार यादीतील मतदारांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मतदान करता येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यात होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती एका टप्प्यात नगरपालिका दुसऱ्या टप्प्यात तर महापालिका निवडणूक तिसऱ्या टप्प्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# गोपाल नगर अंडरपासची आ.रवी राणा यांच्याकडून पाहणी

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा व महारेल अधिकारी यांची उपस्थिती

### आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या सक्रिय भूमिकेचे आमदार राणांकडून पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शहरातील वाहतूक सुलभ होण्यासाठी सुरू असलेल्या २७ कोटी रुपये खर्चाच्या गोपाल नगर अंडरपास प्रकल्पाची पाहणी आज आमदार रवी राणा यांनी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक व महारेल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केली.

पाहणीदरम्यान पाणी साचणे, विद्युत जोडणी, जलनिकासी व ड्रेनेज व्यवस्था अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. या त्रुटींवर तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश आमदार राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.आ. रवी राणा यांनी याआधी पारडी अंडरपास प्रकल्पाची पाहणी केली होती. त्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सांगितले की, आकोली, बडनेरा





व गोपाल नगर येथील अंडरपास प्रकल्पांचे कामे बाहेरील ठेकेदारांकडून सुरू असून, त्यांनी महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण आदी विभागांची सर्व परवानग्या घेऊनच दर्जेदार व समन्वयित पद्धतीने काम करावे, असा स्पष्ट इशारा आमदार राणा यांनी दिला.नवीन नियुक्त आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांनी नुकतीच शहरातील विविध प्रकल्प स्थळांची पाहणी करून कामाचा आढावा घेतला असून, त्यांच्या कर्तव्यनिष्ठ व सक्रिय भूमिकेचे आमदार रवी राणा यांनी विशेष कौतुक केले व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.यावेळी आमदार राणा यांनी गोपाल नगर परिसरात स्कायवॉक प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले. प्रत्येकी सुमारे ४ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पांमुळे नागरिकांना सुरक्षित व सुलभ पादचारी मार्ग उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या पाहणी दरम्यान उपस्थित मान्यवर व पदाधिकारी भाजपचे माजी नगरसेवक सुनील काळे,युवा स्वाभिमान पक्षाच्या माजी नगरसेविका सुमतीताई ढोके,डॉ. राजेंद्र तायडे, उमेश ढोणे,कमल किशोर मलानी, दिलीप भाकरे,घनश्याम ठाकरे,अमन गोलाईतकर, धनराज चौकेशुभम कयथवास, महावीर जैन,राजूभाऊ घवस, सुनील चौधरी,मिथुन बिजवे, सारिका अवघड,वर्षा पाटणे, वनिता तायडे,मंगला जाधव, गौतम हिरे ,यांची उपस्थिती होती.

# विद्युत वितरण कंपनीचा अजब कारभार : बिलाची वसुली करताना महिला व पुरुष ग्राहकांचे असलेल्या अवस्थेत घेतले फोटो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अंजनगाव सुर्जी**

हेडिंग मोठे घेणेअंजनगाव विद्युत वितरण कंपनी कार्यालयाकडून थकबाकीदारांकडून वीजबिल वसूल करण्यासाठी एक नवीन शक्कल लढवली आहे. अंजनगाव विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून सद्या थकीत असलेली वीज बिलांची गावोगावी वसुली सुरू असताना एक नविनच प्रकार ग्राहकांचे फोटो काढण्याचा उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांध्ये महावितरण विरोधात रोष निर्माण झाला आहे.

अंजनगाव शहर व तालुक्यात कर्मचारी वीज बिलाची वसुली करत आहे. वीज बिलाची वसुली करत असताना वीज ग्राहकांचे मोबाईलव्दारे फोटो घेत आहेत. विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी ग्राहकांचे फोटो घेत असल्याने ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली आहे. वीज वितरण कंपनीचे कर्मचारी वीज बिलाची वसुली करत असताना ग्राहक ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत ग्राहकांचे फोटो घेत असुन ते फोटो एका कार्यालयीन वॉटशॉप ग्रुपवर वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवुन कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत असे या वॉटशॉप ग्रुपवरून निर्दशनास येत आहे. याबाबत काही कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता आमच्या वरिष्ठांनी फोटो काढण्याचे आदेश दिले असे सांगितले. हा कोणता प्रकार आहे वीज वसुली करण्याचा असा प्रश्न वीज ग्राहक उपस्थित करत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत वीज बिलांचे पैसे घरातील महिला मंडळी जवळ ठेवून देतात तर शहरातील पुरुष मंडळी व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असताना बहुतांश फोटो काढण्याचा प्रकार महिला व मुलींन सोबत होत आहे. कोणत्याही महिला व मुलींनचे त्या व्यक्तीची परवानगी न घेता फोटो काढणे हा गुन्हा असुन ज्या विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याने असे फोटो काढण्याचे आदेश दिले असेल त्यां अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी वीज ग्राहकांकडून होत आहे. अंजनगाव सुर्जी विद्युत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता तुषार गांजरे यांच्याशी संपर्क साधला असता ग्राहकांचे फोटो काढण्याचे आदेश सर्व जिल्ह्यांना आहे असे सांगितले.

**माहिती तंत्रज्ञान कायदा काय म्हणतो**

कोणत्याही महिलांचे फोटो तिच्या परवानगीशिवाय काढल्यास, तिच्या गोपनीयतेचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो.तसेच तो फोटो सोशल मीडियावर किंवा इतर कोणत्याही माध्यमांवर व्हायरल केला, तर माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो असे असताना सुद्धा कोणतीही ग्राहकांची परवानगी न घेता फोटो काढल्यामुळे आयटी कायद्या अंतर्गत आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

# बोरनदी धरणाजवळील दरोड्यातील सहा आरोपी जेरबंद, नांदगावपेठ पोलिसांची मोठी कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव पेठ**

गत एक महिनापूर्वी दि.६ जून रोजी बोरनदी धरणावर फिरायला गेलेल्या एका युवकाला आणि त्याच्या मैत्रिणीला अज्ञात दरोडेखोरांनी मारहाण करून त्यांच्याजवळील सोनसाखळी आणि रोकड पळविली होती.याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून या घटनेतील चार आरोपी अद्याप फरार आहेत. पोलीस यंत्रणेसमोर गुन्हा उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान असतांना पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे प्रशंसनीय कामगिरी केली.

फिर्यादी सिद्धांत सतीशराव राऊत (वय २८, सिव्हिल इंजिनीयर, रा. फ्रेजरपुरा अमरावती) हा युवक त्यांच्या मैत्रीणीसह बोरनदी धरण येथे गेले



असता, सायंकाळी ७ वाजता घराकडे परत निघतांना तीन दुचाकींवर आलेल्या दहा अनोळखी युवकांनी त्यांना अडवले. त्यांना मारहाण करून त्यांच्याजवळील ४,५०० रुपये रोख आणि मैत्रीणीच्या गळ्यातील सुमारे ४५,००० रुपये किमतीची दहा ग्रॅम सोनसाखळी जबरदस्तीने लुटण्यात आली होती.याप्रकरणी फिर्यादी सिद्धांतच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलीसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(१)(२) प्रमाणे गुन्ह्याची नोंद करून गुन्ह्यातील आरोपींची ओळख पटवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, आणि सहाय्यक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच डीबी पथकाने तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला.अखेर एक महिन्यानंतर पोलिसांना घटनेतील आरोपींचा छडा लागला. यामध्ये आरोपी शारीक खान आबीद खान (वय २२, रा. फातेमा नगर, लालखडी)शेख अयान शेख नसिर (वय २०, रा. लालखडी),मोहम्मद शोएब उर्फ भल्ला मोहम्मद आरिफ (वय १९, रा. यास्मीन नगर),अयान खान आसिफ खान (वय १९, रा. यास्मीन नगर),शेख शरजील उर्फ राज शेख इरफान (वय १९, रा. यास्मीन नगर),शहर व जिल्हा ग्रामीण मधून तडीपार असलेला आरोपी शेख अरबाज शेख मुजीब (वय २२, रा. लालखडी) या सहा आरोपिंना अटक करण्यात आली.तपासादरम्यान या सर्वांनी गुन्ह्याची कबुली दिली असून या गुन्ह्यातील अन्य चार आरोपी अद्याप फरार आहेत आणि त्यांचा शोध सुरू आहे. सदर कारवाईमध्ये ठाणेदार दहातोंडे यांच्यासह पोउपनि वाणी, वाकडे, पोहेकाँ राजा राऊत, पोशि राजीक खान, निलेश साविकार, वैभव तिखीले, राजा सय्यद, संजय नेहारे, चालक पोका वैभव धुरंदर यांनी परिश्रम घेतले.पोलिसांनी केलेल्या या मोठ्या कारवाईने गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण झाली असून बोरनदी परिसरात मॉर्निंग,इविनिंग वॉक करणाऱ्या नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच करवाईमधील पोलीस कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.